


# ज्ञान प्रबोधिनी
# स्त्री-शक्ती प्रबोधन (ग्रामीण)
## वार्षिक वृत्त
राष्ट्रीय शके १९३७-३८ (सन २०१६-१७)

### अनुक्रमणिका


| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ⁂ | मनोगत | ६ | महिला | ⁂ | विशेष लेख |
| १ | किशोरी विकास | ६.१ | बचतगट | १ | नोटाबंदी : |
| २ | युवती | ६.२ | स्वयंरोजगार | | एक आपत्कालीन मदतकार्य |
| ३ | बालवाडी | ६.३ | आरोग्य | २ | कन्याकुमारी दौरा |
| ४ | हिरकणी | ६.४ | नेतृत्वविकसन | | |
| ५ | नव चैतन्य गट | | | | |


# मनोगत

गेल्या १० वर्षांपासून स्त्री शक्ती प्रबोधन-ग्रामीण विभागाच्या कामाचे स्वरूप हे **शब्द ते शक्ती** असे राहिले आहे. यासाठी आपण काम करीत असलेल्या कार्यक्षेत्राचे विकास टप्प्यांप्रमाणे अ, ब, क आणि ड असे चार भाग सोयीकरता केलेले आहेत. यावर्षी क आणि ड या विकास प्रक्रियेत मागे असलेल्या टप्प्यांमध्ये महिलांकरिता जे काम झाले ते प्राधान्याने **शब्द** या प्रकारातले म्हणजेच उत्थान आणि जागरणाचे म्हणजेच जाणीव जागृती झाले. तर अ आणि ब या तुलनेने विकसित भागातील काम हे स्त्री **शक्ती** प्रबोधनाचे झाले. या वर्षीचे वैशिष्ट्य म्हणजे अ आणि ब भागातील महिलांनी क आणि ड भागात जाऊन काम केले. याकरिता नव दिशा, नव चेतना आणि नव चैतन्य गटाच्या ह्या बैठकी माध्यम म्हणून वापरल्या. बचतगट, उद्योजकता, बालविकासाच्या प्रक्रियेसाठी मातांचे प्रशिक्षण व लहान मुलांसाठी दल ही साधने वापरली.

यामुळे दुर्गम भागातील २० गावे नव्याने कामाला जोडली. अगदी लहान लहान वस्त्याही जोडल्या गेल्या. त्या गावांमध्ये नव्याने ८० बचत गट सुरू झाले आणि परिवर्तनाच्या कामांना सुरुवात झाली. यात प्रामुख्याने आरोग्य, उद्योजकता, व्यक्तिमत्त्व विकसन, नेतृत्व विकसन, दुर्गम भागातील बालवाड्या आणि माता प्रशिक्षण अशी कामे झाली.

या वर्षातली आणखी एक महत्त्वाची भर म्हणजे **जीवनज्योती!** आम्बवणे येथे स्टरलाईट टेक फाउंडेशन सोबत युवती प्रशिक्षणाची घेतलेली जबाबदारी. या प्रकल्पाअंतर्गत ६०-६५ गावातून येणाऱ्या १५० युवतींसाठी किमान सहा महिने स्वयंरोजगार कौशल्य प्रशिक्षण देणे व त्यातून त्यांचा व्यक्ती विकसन होईल अशा सत्राची योजना करणे असे काम केले.

महिलांचा आत्मसन्मान वाढविण्याच्या प्रक्रियेमध्ये यावर्षात स्थानिक कार्यकर्त्यांनी दक्षता समितीद्वारे महत्त्वपूर्ण योगदान केले. एकल महिलांसाठीच्या भरीव कामाला सुरुवात केली. वर्षभरात मेळाव्यात आलेल्या २७६ एकल महिलांपैकी ४० जणींसाठी सरकारी योजनांच्या पाठपुराव्याचे नेमके काम केले. वेल्ह्यातील जास्वन्द गिरीकन्या निवास नवीन बांधलेल्या वास्तुत गेला.

यावर्षी सर्व वयोगटांसाठी झालेल्या कामातील मुख्य कामे पुढे तपशिलात दिली आहेत.


**♦ ज्ञान प्रबोधिनी संस्थेचे पदाधिकारी ♦**

- **अध्यक्ष** — डॉ. रघुनाथ माशेलकर
- **उपाध्यक्ष** — डॉ. विजय केळकर, कि. बा. (अण्णा) हजारे
- **कार्याध्यक्ष** — डॉ. प्र. ल. गावडे
- **उपकार्याध्यक्ष** — श. बा. तथा रवि पंडित
- **संचालक** — डॉ. गिरीश श्री. बापट
- **कार्यवाह** — वि. शं. देशपांडे

**२०१६-१७ मधील सहभागी गट**

| | नियमित | प्रासंगिक | एकूण |
|---|---|---|---|
| किशोरी | ३२२ | १२५ | ४४७ |
| युवती | ११४ | ९६ | २१० |
| महिला | ५७७७ | ५०० | ६२७७ |
| | ६२१३ | ७२१ | ६९३४ |

## ★ कामाची रचना



स्त्री शक्ती प्रबोधन विभागाचे ग्रामीण भागातले काम वाढते आहे. गेल्या २-३ वर्षापासून त्याची वेगळी रचना बसवायचा आम्ही प्रयत्न करत आहोत. या वर्षी ही रचना काही अंशी बसली. रचना बसवताना कामाच्या नियोजन-निवेदनाच्या बैठका नियमित होणं हा रचनेचा गाभा तयार झाला. स्त्री शक्ती प्रबोधन विभागाचा निर्णयकर्ता ८ जणींचा गट संचालकांसह दरमहा सहविचारासाठी एकत्र बसला तर प्रकल्पा संबंधी मार्गदर्शन घ्यायला पूर्णवेळ काम करणारा १८ विभाग प्रमुखांचा गट कार्यवाहांसोबत बसला. या शिवाय विषयवार वेगेवेगळ्या बैठकी झाल्या. केंद्र नियंत्रणासाठी वेल्हे-आंबवणे अशा केंद्रवार बैठकींचीही घडी यंदा चांगली बसली. सांगायला आनंद होतो की **या सगळ्या बैठकींमध्ये मिळून ८६ गावातल्या ११० जणी सहभागी झाल्या.**

| क्र. | तपशील | संख्या | बैठकीची वारंवारिता | गाव | बैठक प्रमुख | मार्गदर्शक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सहविचार | ६ | मासिक | पुणे | अश्विनी ठाकर | संचालक |
| २. | विभाग प्रमुख | १८ | द्वैमासिक | शिवापूर | तृप्ती कुलकर्णी | कार्यवाह |
| ३. | शिखर | ८ | साप्ताहिक | पुणे | भारती कामठे | सुवर्णा गोखले |
| ४. | सुकाणू | २१ | मासिक | शिवापूर | भारती खासबागे | सुवर्णा गोखले |
| ५. | किशोरी | ८ | पाक्षिक | आंबवणे | अश्विनी ठाकर | बागेश्री पोंक्षे |
| ६. | युवती | ८ | मासिक | वेल्हे | प्रतिभा स्वामी | बागेश्री पोंक्षे |
| ७. | गिरिकन्या निवास | ७ | मासिक | वेल्हे | रंजिता सरवदे | सुवर्णा गोखले |
| ८. | हिरकणी | १४ | मासिक | आंबवणे | कीर्ती कुंभार | पुनम साठ्ये |
| ९. | बालवाडी | १३ | मासिक | वेल्हे | सुरेखा दिघे | सुषमा दाबके |
| १०. | नव चैतन्य | १२ | मासिक | आंबवणे | मनीषा ननावरे | तृप्ती कुलकर्णी |
| ११. | स्वयंरोजगार | १० | मासिक | शिवापूर | भारती कामठे | सुवर्णा गोखले |
| १२. | शिवापूर केंद्र | ६ | मासिक | शिवापूर | आशा गोगावले | आशा सुर्वे |
| १३. | वेल्हे केंद्र | ७ | मासिक | वेल्हे | शैला भोन्डेकर | सुवर्णा गोखले |
| १४. | नवदिशा | १२ | मासिक | आंबवणे | निर्मला कुंभार | भारती खासबागे |
| १५. | नवचेतना | १२ | मासिक | वेल्हे | रंजिता सरवदे | आशा सुर्वे |
| १६. | प्रबोधिका | ९ | मासिक | वेल्हे | शैला भोन्डेकर | आशा सुर्वे |

## ★ कामाचे हितचिंतक देणगीदार ★

| | | | |
|---|---|---|---|
| श्री. अनंत सेटलवाड | रु. १६,००,०००/- | एन. जी. परांजपे प्रतिष्ठान | रु. ४,००,०००/- |
| श्री. शांताराम पटवर्धन | रु. १,००,०००/- | देवधर क्लासेस | रु. ६०,०००/- |
| बायोवेद फार्मास्युटिकल्स् | रु. ५८,०००/- | प्रदीप मराठे | रु. ५०,०००/- |

**★ रु. २५,०००/-**

राजीव हजरनवीस, मांडके हिअरिंग सर्व्हिसेस, सुबोधन इंजिनीअर्स प्रा. लि., कबीरबाग मठ संस्था, ॲडेप्ट फ्लुइनाईड प्रा. लि., जगन्नाथ शेट्टी,

**★ रु. २०,०००/-**

सुनील चिंचणीकर, अनिता देशमुख, राजीव विळेकर, ब्रह्मे ॲन्ड सन्स,

**★ रु. १०,०००/-**

अरूण पुराणिक, अमर जोशी, नीलिमा रानडे, सुरेश धायगुडे, सतीश मराठे, वासुदेव परळीकर, सुप्रिया गाडेकर, प्रसाद दातार, सतीश दस्तुरीकर, राधा संगमनेरकर, परिणीता मराठे

**✼ या वर्षात एकूण ८३ जणांनी रुपये ४४ लाख एवढी देणगी या कामासाठी दिली. या सगळ्यांचे आम्ही कृतज्ञ आहोत. ✼**

# ९. किशोरी विकास



या वर्षी नियमित तासिकांमध्ये सहभागी असणाऱ्या ३२२ किशोरी, पाठपुरावा केला अशा १२५ अशा एकूण ४४७ किशोरींसाठीच्या कामाची योजना केली ..

✻ **नियमित शालेय तासिका :** यंदा १३ शाळांमधल्या ३२२ किशोरींसाठी नियमित तासिका घेतल्या. प्रत्येक शाळेमध्ये राखी बनवणे, कागदाची फुले, आकाश कंदिल, कागदाचे क्विलिंग व शिवणाचे प्राथमिक काम करणे अशी कौशल्ये शिकवली. संवाद कौशल्य व बहुदिश विचार कसा करावा?, कथाकथन, आरोग्य सत्र, विज्ञान प्रयोग अशीही सत्रे घेतली. सत्रांसाठी पुण्याहून वेळोवेळी १२ तज्ज्ञ मार्गदर्शक आले. वर्षभरात प्रत्येक शाळेमध्ये कौशल्याशिवाय ११ तासिका झाल्या. या उपक्रमाची जबाबदारी ३ ताई व ६ युवतींनी समर्थपणे पेलली.

या व्यतिरिक्त किशोरींसाठी खालील उपक्रम घेतले :

✻ **विज्ञान मार्गदर्शन शिबिर** : शिवापूर येथे दि. ९ ते ११ एप्रिल २०१६ या तीन दिवसात १० वीची परीक्षा दिली आहे अशा किशोरींसाठी विज्ञान मार्गदर्शन शिबीर झाले. या मध्ये ७ गावांतील १० जणी सहभागी झाल्या होत्या. पूर्वाताई हिने विज्ञान शाखेची माहिती दिली तर मानसशास्त्र, सूक्ष्मजीव शास्त्र, इलेक्ट्रॉनिक्स इंजीनिअरिंग व वैद्यकीय शाखेची माहिती देण्यासाठी त्या त्या शाखेतील विद्यार्थिनी आल्या होत्या.

✻ **नेतृत्व शिबिर :** दि.१६ ते १८ एप्रिल २०१६ या कालावधीत भोर येथील स्काउट ग्राउंडच्या जागेवर नेतृत्व शिबिर झाले. हे शिबिर निवासी होते. त्यात नियमित तासिकांना येणाऱ्या ६ गावातल्या २२ निवडक किशोरींना बोलावले होते. नेहेमीच्या शिबिरापेक्षा वेगळे असे नेतृत्व गुणांचे विशेष प्रशिक्षण देण्याचे नियोजन या शिबिरात केले होते. प्रभावी वक्तृत्व प्रशिक्षणाची सत्रे घेण्यास सुनिलाताई गोंधळेकर आल्या होत्या तर अश्विनीताई ठाकर यांनी गटकार्याचे सत्र घेतले. या शिवाय जोडीने काम करण्याचा अनुभव देण्यासाठी जोडीकार्ये दिली होती. भोर गावामध्ये जाऊन दोनच्या गटामध्ये जोडीने करायला काही कामे दिली होती. उदा. एस टी स्टँडवर जाऊन मुलाखती घेणे, बाजार पेठेतून आणि तहसील कार्यालयातून माहिती





मिळवणे. अशी काही वेगळीच कामे मुलींनी जोडीने आनंदाने केली. नेतृत्व शिबिराच्या शेवटच्या दिवशी सगळा गट रायरेश्वर गडावर गेला. अनेक जणी प्रथमच गडावर जात होत्या. तेथेच नेतृत्व शिबिराचा समारोप झाला.

✻ **कथाकथन स्पर्धा :** दि. ८ ऑक्टो. २०१६ रोजी कथाकथन स्पर्धा घेण्यात आली. यामध्ये ७ शाळेतील ३२ किशोरींनी सहभाग घेतला होता. दर वर्षी प्रमाणेच साने गुरुजी कथामालेच्या सहकार्याने ही स्पर्धा झाली. इ. ८ वी व इ. ९ वीच्या प्रत्येकी ३ जणींना बक्षिसे दिली.

✻ **तंबूतील निवासी शिबीर :** दि. २४ ते २६ मे २०१६ या कालावधीत कुसगावच्या धनगर वस्तीवर ३ दिवस २ रात्री असे किशोरींचे निवासी तंबू शिबिर झाले. ११ शाळेतून १३३ मुली या शिबिरात सहभागी झाल्या होत्या. **चौकटी बाहेरचा विचार करायला शिकणे** हा या शिबिराचा विषय होता. यासाठीचे पहिले सत्र डॉ. वनितताई पटवर्धन यांनी घेतले, वेगळा विचार कसा करता येईल हे वेगवेगळे खेळ घेऊन सांगितले. त्याच बरोबर कल्पना शक्तीची परिभाषाही मुलींना समजून सांगितली. प्रभाताई इनामदार यांनी त्रिमिती किमया हे सत्र खेळा-खेळातून घेतले तर सुनीलाताई गोंधळेकर यांनी प्रसंग नाट्याचे प्रशिक्षण दिले. सत्रा नंतर लगेचच किशोरींनी प्रसंग नाट्य बसवले. शिबिराला आलेल्या १३३ किशोरींपैकी ७० किशोरींनी जवळच्या ६ गावात जाऊन ही झटपट बसवलेली प्रसंग नाट्ये सादर सुद्धा केली. त्या बरोबरच सगळ्या गावातील मुला-मुलींसाठी मेळावे घेतले. या गावातल्या रात्रीच्या छोट्याशा मेळाव्याला १८५ मुले-मुली सहभागी झाले होते. मेळावे घेऊन रात्री शिबिरस्थानी परतायचे होते. जवळची गावे होती म्हणून गावातून परतताना चांदण्यात चालत येणे अशी योजना केली होती. हा एक वेगळाच अनुभव योजला होता. मुलींना हा अनुभव अतिशय आवडला. हा रात्रीचा चांदण्यातला प्रवास आयुष्यभर लक्षात राहील असे समारोपात अनेकींनी सांगितले.



✻ **सायकल फेरी :** दि.१९ मार्च रोजी जीवनज्योती आंबवणे येथून निघून मार्गासनी, साखर, भागीनघर, कोदवडी मार्गे पुन्हा जीवनज्योतीमध्ये परत येणे अशी ३० किमी सायकल प्रवासाची फेरी योजली होती. त्यात ७ शाळेतल्या ३६ किशोरी, ८ युवती व ६ कार्यकर्त्या अशा एकूण ५० जणींनी सहभाग घेतला. अतिशय आनंदात ही फेरी झाली. हे सायकल फेरीचे तिसरे वर्ष होते.

✻ **सुट्टीतील गाव पातळीवरील मेळावे** : गेल्या वर्षी प्रमाणेच यंदाही गावपातळीवर मेळावे घ्यायचे ठरवले. सौर ऊर्जेचे ४ प्रयोग, पद्य व काही खेळ असे गावोगावी घ्यायचे अशी कार्यक्रम पत्रिका ठरवली. या प्रमाणे प्रत्यक्ष **१०२ गावांमध्ये जाउन २०२५ मुला-मुलींसाठी मेळावे घेतले.** कमीतकमी

वेळात एवढ्या गावात मेळावे घेणे शक्य झाले ते केवळ युवतींच्या सहभागामुळेच! यासाठी २२ युवतींचे आधी प्रशिक्षण घेतले. याप्रशिक्षणात सौर ऊर्जेचे प्रयोग करायला शिकवले व ते प्रयोग गाव पातळीवर कसे दाखवायचे याचेही प्रशिक्षण दिले, त्याशिवाय गाववार कोणी कोणी कसे जायचे याचेही नियोजन केले. १९ प्रशिक्षित युवती व ३ ताई यांनी मिळून भोर, वेल्हे, हवेली तालुक्यातील १०२ गावात हे मेळावे घेऊन विक्रम प्रस्थापित केला.

**⁕ कुमार साहित्य संमेलनात सहभाग :** छात्र प्रबोधन मासिकाच्या वतीने दि. ७–८ जाने. रोजी निगडी येथे कुमार साहित्य संमेलन आयोजित करण्यात आले होते. त्याला कल्याण, कुसगाव, वरवे, कांजळे या ४ गावातल्या २५ किशोरींनी सहभाग घेतला. याच्या कार्यवाहीची जबाबदारी पूजा जाधव या माजी किशोरीने घेतली व यशस्वीरीत्या पार पाडली.

या वर्षी ज्ञान प्रबोधिनीच्या संशोधन विभागासोबत ५ वी ते ७ वी या वयोगटासाठी ऑक्टोबर २०१६ पासून **२ नवीन संशोधन प्रकल्प** सुरू केले.

**⁕ सुमेधा प्रकल्प :** गुहिणी, वाजेघर, वेल्हे व शिवरे या गावातल्या मुलींमधली बुद्धिमत्ता शोधून त्याचे संवर्धन करणे, असा प्रकल्पाचा विषय होता. डॉ. सुजलताई यांच्या मार्गदर्शनाने या प्रकल्पातल्या १२६ मुलींसाठी विविध कौशल्य प्रशिक्षणाची व्यवस्था गावोगावी केली. त्यात रांगोळी, क्विलिंग, मातीकाम, संवाद कौशल्य अशी काही प्रशिक्षणे होती. या प्रकल्पातील सर्व कौशल्ये युवती गटाने आधी शिकणे व मग गटाला शिकवणे अपेक्षित होते.



तसे झाले. या प्रकल्पा अंतर्गत त्या त्या गावात मुलींचे गावातच २ दिवसाचे निवासी शिबिर झाले व पुण्यात एक दिवसाची अभ्यास सहल झाली. त्यात ज्ञान प्रबोधिनीची मुख्य वास्तू बघणे, तिथे चालणारे काम बघणे असे झालेच पण त्या शिवाय विविध कला दाखवणारे पुण्यातील आदिवासी संग्रहालयही मुलींनी बघितले. असे एखादे संग्रहालय बघणे असा अनेकींसाठी आयुष्यातला पहिलाच अनुभव होता. ७०–८० किलोमीटरचा प्रवासही प्रथमच केलेल्या गटातल्या बहुतेक जणी होत्या. त्याच दिवशी अजून एक सादरीकरण त्यांनी पाहिले. साधारण त्यांच्याच वयाच्या शहरातल्या मुली काय दर्जाचे सादरीकरण करू शकतात ते बघायला मिळावे म्हणून ज्ञान प्रबोधिनी प्रशालेचा अभिव्यक्ती सादरीकरणाचा कार्यक्रमही सहलीतील सगळ्यांना दाखवला. या प्रकल्पात मुलींनी अतिशय आनंदाने सहभाग घेतला.

**⁕ सतेज प्रकल्प :** डॉ. ज्योती कानिटकर यांच्या मार्गदर्शनाने हा प्रकल्प शिवापूर, श्रीरामनगर व कल्याण या ३ गावातील ६५ मुलींसाठी सुरु आहे. या प्रकल्पात भरपूर खेळ व त्यासोबत मार्गदर्शन मिळाल्यामुळे व्यक्तिमत्त्वात काय काय बदल होऊ शकतात यावर संशोधन अभ्यास चालू आहे.

या दोन्ही प्रकल्पासाठी स्थानिक **८ युवतींनी प्रशिक्षक म्हणून काम पाहिले.** त्या निमित्त मुलींना शिकवायच्या अनेक गोष्टी युवती आधी करायला शिकल्या. तसेच या संशोधन प्रकल्पामुळे संशोधकांच्या बरोबर काम केल्यामुळे संशोधनाची शिस्तही शिकल्या. त्यासाठी प्रकल्पातील प्रत्येक मुली बद्दलची नोंद करायला शिकल्या हे विशेष!

**⁕ शैक्षणिक शिष्यवृत्ती व कमवा आणि शिका :** गावोगावच्या १५० होतकरू विद्यार्थ्यांना सेवा सहयोग या संस्थेच्या सहकार्याने जवळ जवळ १५० दप्तरे व शैक्षणिक साहित्याचे गावासमोर वाटप केले. त्या शिवाय ३ माजी किशोरींना पुण्यात कमवा आणि शिका या योजनेची संधी उपलब्ध करून दिली. तर वेल्ह्यात २ युवतींना प्रकल्पात कामाची संधी दिली. ज्याद्वारे त्यांनी त्यांच्या फीचे पैसे कमावलेच पण याशिवाय कामाचा अनुभवही मिळाला आणि आत्मविश्वासही वाढला, हे विशेष!

## जास्वंद गिरीकन्या मुलींचा सहनिवास

२०१४–१५ ला सुरू झालेल्या जास्वंद गिरीकन्या निवासाचे हे तिसरे वर्ष. यंदा निवासाच्या इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले. आता निवासाला प्रशस्त जागा मिळाली. या वर्षी निवासामध्ये २३ विद्यार्थिनी व ३ ताई अशा २६ जणी रहात होत्या. या मुलींना एकत्र राहिल्यामुळे, कौटुंबिक वातावरणापेक्षा वेगळे राहिल्यामुळे शिस्तीची सवय तर लागलीच पण अभ्यासाची सवय सुद्धा लागली, वेगळ्या वातावरणामुळे अभ्यासाचे महत्त्वही पटले. त्याशिवाय त्या निवासात आल्यामुळे अनेक गोष्टी अनुभवू शकल्या.



नाममात्र शुल्क घेऊन आपण निवासाची सोय केली. मुलींच्या मुलींच्या जेवणाचा पूर्ण खर्च एन. जी. परांजपे प्रतिष्ठानने उचलला तर व्यवस्थापकीय खर्च व वास्तू बांधकाम श्री. अनंत सेटलवाड यांच्या देणगीमुळे शक्य झाले. निवासात राहून मुलींनी अभ्यासाबरोबरच खालील अनेक गोष्टी केल्या.

**+ शनिवारची शाळा :** व्यक्तिमत्त्व विकासासाठी शनिवारची शाळा हा उपक्रम राबवला. त्यात बौद्धिक खेळ, गणिताच्या गमती जमती, सुदान, कंबोड्या या देशांची माहिती घेणे, नकाशा वाचन करणे, रांगोळी–पणत्या रंगवायला शिकणे, प्रतिकृती बनवायला शिकणे, चौकटी बाहेरचा विचार करणे अशी अनेक सत्रे झाली.



**+ नवीन पदार्थ बनवायला शिकणे :** सहनिवासातील युवतींना महिन्यातून एक नवीन पदार्थ बनवायला शिकवायचा असं ठरवलं आहे. त्यात यावर्षी इडली, पावभाजी, ढोकळा, बेसन लाडू, शेपुची वडी, कोबीची वडी, थालीपीठ, अळूची वडी, बटाट्याचे पराठे हे पदार्थ शिकवले.

**+ आरोग्याची माहिती :** या शिवाय वयात येतानाच्या आरोग्याची माहिती सांगायला व आरोग्य तपासणी करायला डॉ. शुभांगी कानिटकर येऊन गेल्या.

**+ नवीन ठिकाणी भेटी :**



- ५-७ वीच्या मुलींची गंमत सहल निगडीच्या अप्पूघरला गेली.
- ८-१० वीच्या मुली चिंचवड सायन्स पार्क बघून आल्या.
- निवासातल्या सर्व मुली तोरणा व रायरेश्वर किल्ल्यावर जाऊन आल्या.

**+ बरची पथक :** गणेशोत्सवात मुलींनी बरची पथक तयार केले.

**✻ निवासामुळे शाळेच्या उपक्रमात सहभाग संधी :** सरावाला हजर रहाता आल्यामुळे तीन किशोरींनी तालुकास्तरीय व जिल्हास्तरीय खो खो स्पर्धेत शाळेकडून सहभाग घेतला. तर तिघींनी शाळेच्या शरद मल्हारमध्ये सादर झालेल्या नाचात भाग घेतला. एकीने रांगोळी स्पर्धेत भाग घेतला तर ६ जणींनी समूहगीत स्पर्धेत भाग घेतला. एकीने शाळेच्या स्काउटमध्ये सहभाग घेतला तर काही जणींनी निवासात शिकलेल्या गोष्टी बनवून शाळेत स्टॉल लावला.

हे सगळे करताना १२ वी व प्रथम वर्ष शिकणाऱ्या निवासातल्या मुली तालुक्यात पहिल्या आल्या हे विशेष!

## २. *युवती*



**✻ नियमित तासिका :** यंदाही गेल्या वर्षाप्रमाणेच वेल्हे, विंझर व दापोडे या ३ महाविद्यालयांत मिळून २३ तासिका झाल्या. या तासिकांमध्ये भावना परिचय, मुलाखत तंत्र, अभ्यास कौशल्य, नियोजन कौशल्य, गटकार्य, कल चाचणी तयारी हे विषय घेतले गेले. या उपक्रमात २८ गावांतील ११४ युवती सहभागी झाल्या. युवती गटासाठी संपर्क करण्यासाठी या तासिका खूपच उपयोगी पडल्या. नियमित तासिकांमुळे महाविद्यालयांशी संपर्क नव्याने प्रस्थापित झाला.

**✻ जास्वंद वर्ग :** यंदा जास्वंद वर्गाची १३ वी तुकडी पार पडली. नेहेमी प्रमाणे हा वर्ग आठवड्यातले ४ दिवस ४ तास असा ४ महिने चालवला. या वर्गात व्यक्ती विकास व कौशल्य विकासावर भर होता. हा वर्ग सोंडे सरपाले या गावात झाला. काही कारणाने शाळा सोडावी लागलेल्या युवतींसाठी ही शिक्षणाची उत्तम संधी होती. १५ युवती या वर्गात येऊन शिवण, मणीकाम, क्रेलिंग, ओरिगामी या हस्त कौशल्यांबरोबरच युवती गटासमोर उभे राहून बोलायला शिकल्या. गावगाडा कसा चालतो या साठी त्यांनी ग्राम पंचायत सदस्यांच्या मुलाखती घेतल्या आणि सहलीलाही जाऊन आल्या.

**✻ संगणक :** या वर्षी प्रतिभाताईने वेल्ह्यात २ महिने कालावधीचे संगणकाचे ३ वर्ग घेतले. यामध्ये मायक्रोसॉफ्ट ऑफिस शिकवले. या वर्गाला १२ गावातून २८ युवती आल्या होत्या.

**✻ विविध प्रशिक्षणे :** या शिवाय कमी कालावधीचे गाव पातळीवर कौशल्य वर्ग झाले. त्याचा लाभ १०४ जणीनी घेतला.

| क्र. | कौशल्य | गावे | संख्या | कालावधी |
|---|---|---|---|---|
| १. | मणी आकाश कंदिल | ११ | ३५ | २ दिवस |
| २. | क्रेलिंग | १० | २४ | १ दिवस |
| ३. | शिवण | ३ | ४५ | २ महिने |



**✻ सहल अभ्यास/दौरा/नवीन ठिकाणी भेटी :** उस्मानाबाद येथिल प्रबोधिनीच्या हराळी केंद्रावर निवासातल्या युवतींनी भेट दिली. जवळच्या गावात जाऊन गटाने ३ तासाचे मेळावे घेतले. त्या वेळी त्यांनी सोलापूर येथील भारत पेट्रोलियम कंपनीला भेट दिली व सिलेंडर कसे भरतात ते पाहिले तर सोलापुरात टॉवेलचा कारखाना बघितला. वाटेत ऐतिहासिक नळदुर्गचा किल्लाही पाहिला. या निमित्त अनेक जणींनी रेल्वेतून पहिल्यांदा एवढा मोठा प्रवास केला.



**✻ अभ्यास शिबिर :** ज्या युवती नियमित तासिकांना बसत होत्या अशा युवतींचे पुण्यात २ दिवसाचे शिबिर घेतले. त्याला २२ गावातल्या ५० युवती आल्या होत्या. शिबिराचे पहिले सत्र पुण्यातील प्रबोधिनी बघणे व तिथेच करिअर मार्गदर्शनावर फिल्म बघणे असे होते. हे शिबिर एक दिवस मुक्कामाचे होते. शिबिराचा मुक्काम महर्षी कर्वे इंस्टिट्यूटमध्ये होता. या शिबिरात कर्वे इंस्टिट्यूट मध्ये चालणारे कोर्स कुठले व त्यासाठी काय पात्रता लागते याची तपशिलात माहिती करून दिली. पुढील शिक्षणासाठी हे सत्र अतिशय उपयुक्त ठरले. **स्त्री व शिक्षण** या विषयावरही शिबिरात व्याख्यान झाले. शिबिराच्या शेवटी युवतींची दृष्टी विस्तारावी म्हणून थिएटरमध्ये जाऊन युवतींना दंगल सिनेमा दाखवला. कुस्ती खेळणारी मुलगी हा सिनेमाचा विषय मुलींना भावला. मोठ्ठ्या स्क्रिनवर थिएटरमध्ये जाऊन सिनेमा बघणे हा अनुभव बहुतेकींनी प्रथमच घेतला.



**✻ वारीमध्ये सहभाग :** ११ युवतींच्या गटाने आळंदी ते पुणे पायीवारी मध्ये सहभाग घेण्याचा आनंद लुटला. गावात एकादशीचा भजनाचा कार्यक्रम करणे नि पायीवारीत सहभाग घेणे हे खूप वेगळे असते असे गटाने अनुभवले!

**✻ जीवनज्योती महिला सक्षमीकरण केंद्र :** स्टरलाईट टेक फाऊंडेशनच्या सोबत अजून जास्त जबाबदारीने कामाला सुरुवात झाली. युवतींना स्वयंरोजगार कौशल्ये



शिकवून त्यांचा आत्मविश्वास वाढावा हा या प्रकल्पाचा मुख्य उद्देश. या वर्षी तेथे साधारण १५० युवतींनी शिवण, पार्लर, संगणक ह्या ६ महिन्याच्या कोर्स मध्ये व वर्षभर चालणाऱ्या नर्सिंग कोर्समध्ये प्रवेश घेऊन महाराष्ट्र शासनाचे प्रमाणपत्र मिळवले. या शिवाय टॅली व ॲडव्हान्स पार्लर वर्ग असे विशेष कौशल्य प्रशिक्षण देणारे प्रशिक्षण २० जणींनी घेतले.

*** युवतींना प्रशिक्षक म्हणून संधी :** दुसऱ्याला शिकवलं की आपले शिक्षण पक्के होते असं म्हणतात. आणि एवढंच नाही तर असे शिकवायचे ठरवले की मनाची तयारी करावी लागते, शिकवायच्या कौशल्यावर प्रभुत्व मिळवावे लागते, वेळेचे-कामाचे नियोजन करावे लागते, अनोळखी भागात प्रवास करावा लागतो. यामुळे युवतींचा आत्मविश्वास उल्लेखनीय वाढतो म्हणून यंदा युवतींसाठी ठरवून अशा अनेक प्रशिक्षण-संधी योजल्या होत्या. जवळपासच्या पण अनोळखी गावात जाऊन प्रशिक्षण देणे ही संधी खालील युवतींनी घेतली.

**प्रशिक्षक होण्याची संधी घेणाऱ्या युवती**

| | | |
|---|---|---|
| १. | मण्याचा आकाश कंदील | ८ |
| २. | ओरिगामी | २ |
| ३. | किशोरी तासिकांना मदत | ६ |
| ४. | सुमेधा प्रकल्प | ९ |
| ५. | किशोरी शिबिरे | १७ |
| ६. | गाववार मेळावे | ७ |



*** गणेशोत्सव :** यंदा सहनिवासातील किशोरींनी बरच्या केल्या तर युवतींनी वाद्य म्हणजे ढोल, ताशा वाजवले. याचा सराव आधीपासून ६ महिने सुरू केला होता. ८ गावातल्या १६ युवतींनी यात भाग घेतला. वेल्हे गावातल्या गणपती विसर्जन मिरवणुकीत हे पथक सहभागी झाले होते. मुलींचे हे क्रिडा पथक बघायला तालुक्यातल्या खूप गावांतून ग्रामस्थ आले होते, त्यांनी मुलींचे कौतुक केले.

## ३. बालवाडी

या उपक्रमाचे हे चौथे वर्ष! वाडी-वस्तीवरील ९५ मुले आपल्या १० बालवाड्यांमुळे शिक्षण प्रवाहात नियमित सहभागी झाली. नुसते पुस्तकी शिक्षण न देता मुलांच्या सर्वांगिण विकासावर बालवाडीत भर दिला. भाषा, गणित, विज्ञान असे विषयसुद्धा बाल शिक्षणात शिकवले. त्याच बरोबर पायी सहली, विविध सण ही साजरे केले. त्यामुळे निसर्ग निरीक्षण, भारतीय संस्कृतीची ओळख झाली. वेगवेगळ्या खेळाच्या माध्यमातून शारीरिक विकासाकडे लक्ष दिले गेले. हे सगळे करण्याचे नियमित प्रशिक्षण व महिन्याचे नियोजन बालवाडीताईं सोबत मासिक बैठकीत केले.

बालवाडीताईंच्या स्वतःच्या क्षमतांचा विकास व्हावा म्हणून या वर्षी प्रथमच बालवाडीसाठी लेखी नियमावली तयार केली. त्याप्रमाणे आपली बालवाडी सध्या कोणत्या टप्प्यावर आहे व ती उत्तमतेकडे जाण्यासाठी अजून काय काय करावे लागेल याचे मार्गदर्शन केले. या नियमावलीमुळे आदर्श बालवाडी कशी असावी? याचे चित्र ताईंच्या नजरे समोर उभे केले. ज्ञान प्रबोधिनीच्या सोलापूर शाखेत शिशु अध्यापिका विद्यालय चालवले जाते. त्या प्रकल्पाच्या शिशुशाळेला भेट देण्यासाठी आपल्या बालवाडी ताईंची सोलापूरला सहल आयोजित केली होती. सोलापूरच्या बालवाडीमध्ये घेतले जाणारे उपक्रम, प्रगतीपुस्तक, पाठटाचण, पाठाची वातावरण निर्मिती, पाठांची तयारी, मुलांशी करण्यात येणारे संभाषण असे सगळे त्यांनी पाहिले-अनुभवले. बालवाडीतील मुलांसोबत ताईंची ही प्रगती व्हावी, ती मोजता यावी म्हणून या वर्षी लेखी परीक्षा घेतली. या साठी मादाम मॉन्टेसरी नोबेल, अनुताई वाघ, ताराबाई मोडक यांची बालवाडीच्या संदर्भातील माहिती असणारी पुस्तके सर्वांना अभ्यासासाठी दिली होती.

| क्र | गाव | प्रशिक्षक | मुलांची संख्या |
|---|---|---|---|
| १ | कुसगाव | भाग्यश्री गोरे | १० |
| २ | जाधववाडी | सुनीता महाडिक | ९ |
| ३ | नाळवट | उषा भुरुक | ११ |
| ४ | माजगाव | संगिता धुमाळ | ६ |
| ५ | कोंढाळकर वस्ती | लता कोंढाळकर | ५ |
| ६ | गेळगणे | तान्हुबाई ढेबे | १३ |
| ७ | देवपाल | नीता शिळीमकर | १६ |
| ८ | सणसवाडी | संगीता खुळे | ७ |
| ९ | रासदंड वाडी | कुंदा कचरे | १२ |
| १० | डाळ वाडी | मनिषा गोरे | ६ |
| | एकूण | १० | ९५ |

*** सकस आहार योजना :** या शिवाय सर्व बालवाडीतील मुलांसाठी फेब्रुवारी पासून सकस आहार योजना राबवण्यात येत आहे.

या शिवाय बालवाडीत खेळण्यासाठी विविध साहित्याचे वाटप केले. मुलांना गणवेशही दिले. पुण्यातील तज्ज्ञ वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून मुलांची आरोग्य तपासणीही करण्यात आली.

*** आजी-आजोबा मेळावा :** या वर्षी प्रथमच मुलांच्या आजी-आजोबांच्या मेळाव्याचे आयोजन केले होते. त्याला ४० आजी-आजोबा आले होते. मुलांना खेळातून कसे शिक्षण दिले जाते याची छोटी छोटी प्रात्यक्षिकेही त्यांना करायला सांगितली. फुगे फुगवणे, धान्य वेगळी करणे असे खेळ आजी-आजोबाही आनंदाने खेळले. स्वतः शिकले नसल्यामुळे नातवडांना बालवाडीत रोज पाठवण्याचा आग्रह आजी आजोबांकडून कमी पडतो म्हणून हा मेळावा योजला होता. त्यात या खेळाशिवाय आजी-आजोबांची नातवंडाच्या शिक्षणातली भूमिकाही हिराबाई जोरवेकर या एका आजीने मांडली. आजी-आजोबांच्या प्रतिसादामुळे मेळावा यशस्वी झाला.

# ४. हिरकणी

शून्य ते सहा वयोगटातल्या मुलांच्या आईचे पालकत्वाचे शिक्षण म्हणजे **हिरकणी उपक्रम!** या उपक्रमात गावोगावी अशा मातांचे महिन्याला एक या प्रमाणे ६ महिने प्रशिक्षण होते. वर्ष भरात ११ गावात हा उपक्रम सुरू झाला. मार्च अखेर ९ गावांमधली सर्व सत्रे पूर्ण झाली, ज्यामध्ये १४४ हिरकणी सहभागी झाल्या. २ गावात चालू आहेत. ही सत्रे जून अखेर संपतील.

यंदा पुण्यातील ३ प्रशिक्षकांशिवाय ९ स्थानिक हिरकणींनी प्रशिक्षक म्हणून जबाबदारी उचलली. या सगळ्या पूर्वी प्रशिक्षणार्थी होत्या. अनुभवाने व बाल संगोपनाच्या आवडीने प्रशिक्षण घेऊन जवळच्या गावात हे शिकवायला तयार झाल्या. त्यांनी जोडीजोडीने गावात जाऊन ११ पैकी ७ गावांची जबाबदारी घेतली व यशस्वी रीत्या पार पाडली. दर महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात प्रशिक्षकांची आढावा बैठक घेतली. या बैठकीला १३ जणी अपेक्षित असायच्या. बैठकीत महिन्याचे गाव पातळीवर काम काय करायचे त्याचे नियोजन, केलेल्या कामाची निवेदने, काम करताना प्रत्यक्ष आलेल्या अडचणीवर चर्चा करून पर्यायही शोधला जायचा. त्यांच्या कामाचे अवलोकन पुण्यातील प्रशिक्षकांनी केले.





कल्पना दळवी या स्वतःच्या बहिणीच्या लग्नासाठी माहेरी गेल्या होत्या. परंतु लग्नाच्या दुसऱ्याच दिवशी हिरकणी सत्र होते म्हणून त्या लगेचच परत आल्या. लग्नाइतकेच हिरकणी सत्रही त्यांना महत्त्वाचे वाटले एवढे ते मनात ठसणारे होते आहे.

**गाववार हिरकणी सत्रे**

| क्र | गाव | सहभागी सदस्य | सत्रे |
|---|---|---|---|
| १ | गाऊडदरा | १५ | ५ |
| २ | कुसगाव | १२ | ५ |
| ३ | आर्वी | १७ | ६ |
| ४ | मार्गासनी | १८ | ६ |
| ५ | दापोडे | १३ | ६ |
| ६ | धानेप | १७ | ६ |
| ७ | पाल खु. | १३ | ६ |
| ८ | पाल बु. | १२ | ६ |
| ९ | चऱ्हाटवाडी | १२ | ६ |
| १० | वेल्हे | १५ | ६ |
| | एकूण | १४४ | ५८ |

बचतगटाच्या नवरात्री मेळाव्या मध्ये जाऊन या हिरकणी प्रशिक्षकांनी नेतृत्वाची संधी घेतली. गावोगावी जाऊन या उपक्रमाची माहिती सांगितली. त्यामुळे गटासमोर बोलण्याचा त्यांचा आत्मविश्वास वाढला. याशिवाय सानेगुरुजी कथामालेच्या सहकार्याने या गटाचे कथाकथन प्रशिक्षण घेतले.

तसेच जाणीव जागृती वर आधारित एक बैठक बागेश्रीताईंनी घेतली. वरील सर्व उपक्रमाबरोबर एक वेगळा अनुभव म्हणून पुण्याच्या सिनेमागृहात दंगल हा चित्रपट पहिला. सिटी प्राईड अभिरुचीचे मालक श्री. चाफळकर व श्री. गानू यांनी सोय केल्यामुळे दंगल सिनेमा मोठ्या सिक्रनवर बघता आला. या प्रशिक्षिका बाकी हिरकणींसाठी आदर्श आहेत असे गावात फिरताना लक्षात यायचे. घरचे सगळे सांभाळून नाममात्र का होईना पण कमावती झाल्यामुळे माझा घरातला सन्मान वाढला नि आत्मविश्वासही वाढला असे त्या आवर्जून सांगतात.

* **आजी–माजी हिरकणींचा मेळावा** : करंजावणे येथे आजी–माजी हिरकणींचा मेळावा योजला होता. त्याला १७५ जणी १७ गावातून आल्या होत्या. या मेळाव्याची पूर्ण जबाबदारी प्रथमच स्थानिक प्रशिक्षिकांनी घेतली व योग्य रितीने पार पाडली. ग्राममंगल संस्थेच्या ज्येष्ठ कार्यकर्त्या प्राचीताई नातू यांनी महिलांना मार्गदर्शन केले.

**हिरकणीमुळे ओळख मिळाली!**

गावात नवीन सुनेला लग्न झाल्यावर एक-दोन पोरं झाली की मगच लोक ओळखायचे. तो पर्यन्त ना ती कोणाला ओळखायची ना तिला कोणी ओळखायचे!

हिरकणीत आल्यावर मात्र चित्र बदलले! तिला तिच्या बरोबरीच्या मैत्रिणी मिळाल्या. हिरकणीत आल्यावर तुझी सासू माझी सासू करण्यापेक्षा मुलाच्या वाढीबद्दल देवाण-घेवाण हाच गप्पांचा महत्त्वाचा विषय झाला.

दुसऱ्या गावात जाऊन सत्र घेत होती अशी एक हिरकणी तर म्हणाली कि आता माझ्या नावाने सासुला ओळखतात.... पूर्वी मला त्यांची सून म्हणून ओळखायचे!

# ५ . नव चैतन्य गट

नव चैतन्यगटाचे हे पहिले वर्ष! नव चैतन्य गट म्हणजे गावातले दल! प्रबोधिनीच्या कार्य पद्धतीत दलाला अनन्य साधारण महत्त्व आहे. मुलाच्या शारिरीक, मानसिक घडणीची प्रक्रिया या गटातून होणे अपेक्षित आहे. हिरकणी बैठकीत बोलणे होऊन इ १ ली ते ७ वी वयोगटातील मुलां–मुलींसाठी गावपातळीवर प्रयोग म्हणून दल सुरू करायचे ठरले. या गटाला **नव चैतन्य गट असे नाव दिले.** ज्या गावात हिरकणी सत्र झाली अशा ६ गावात दल सुरु झाले. दल घेण्यासाठी हिरकणीचे प्रशिक्षण घेतले. दलाला १७० मुला–मुलींनी प्रतिसाद दिला. हे दल १ एप्रिल ते १५ जून या उन्हाळी सुट्टीच्या कालावधीत सोमवार ते शुक्रवार ५ ते ६ या वेळात मैदानावर घेतले गेले. यामध्ये खेळ, सूर्य नमस्कार, पद्य, पुस्तक वाचन अशा गोष्टी घेतल्या गेल्या. अशा प्रकारे गावोगावी दले सुरू झाली.



मुलांना दलावर येणे एकत्र खेळणे तर आवडलेच पण टि व्ही शिवाय मुलांना आनंदाने खेळताना पाहून पालकही दलावर जाण्याचा आग्रह करू लागले. हा प्रयोग यशस्वी झाला

| क्र | गाव | प्रशिक्षक | मुलांची संख्या |
|---|---|---|---|
| १ | कुसगाव | कल्पना चोरमले | २० |
| २ | घोडेपडळ | कविता कदम | १७ |
| ३ | आंबवणे | किर्ती कुभांर | २२ |
| ४ | आंबवणे | विजया ननावरे | २० |
| ५ | करंजावणे | उषा शिंदे | २५ |
| ६ | करंजावणे | वैशाली पोळ | २२ |
| ७ | बोरावळे | रूपाली शिळीमकर | १७ |
| ८ | वेल्हे | राणी सुतार | २२ |
| | एकुण | ८ | १६५ |

हे वेगळे सांगायला नकोच!※ **आनंद मेळावा :** दि. २ जून रोजी या गटाचा आबंवणे येथे आनंद मेळावा झाला, त्यात १०४ मुले सहभागी झाली होती. १५ जून नंतर साप्ताहिक दोन दिवस असे गावपातळीवर दल  चालू राहिले. दि.१४ नोंव्हे बालदिना निमित्त या गटाचा मेळावा झाला. त्याला १७५ मुले आली होती. ८ हिरकणी प्रशिक्षकांनी या उपक्रमाची जबाबदारी घेतली. या निमित्ताने त्यांना गावपातळीवर नेतृत्व करण्याची संधी मिळाल्याचा आनंद त्यांच्या मनोगतातून व्यक्त झाला.

**वर्षांत–वर्षारंभ समारंभ**

ज्ञान प्रबोधिनीची वैशिष्ट्य असणारे हे समारंभ! यंदा संचालकांच्या मार्गदर्शनाने शिवापूरमध्ये वर्षांत समारंभ पार पडला. त्यात ३६ गावाहून ४५ जणींनी सहभाग घेतला. तर वर्षारंभ समारंभ वेल्ह्याला झाला. प्रबोधिनीच्या स्पर्धा परीक्षा विभागाच्या प्रमुख साविताताई मार्गदर्शनासाठी आल्या होत्या.

# ६. *महिला*

## ♦ ६.१ बचतगट ♦

शिवगंगा–गुंजवणीच्या खोऱ्यातील ज्ञान प्रबोधिनीचे बचत गटाचे काम जिजामाता प्रबोधन केंद्राद्वारे चालते. महिला सभासदांचे बचतगट तयार होतात, हा गट ज्या गटाचा सभासद असतो त्याला विभाग म्हणतात आणि विभाग पुढे संघाला जोडलेला असतो. गट कुठल्याही गावात सुरू झाला तरी संघाच्या बैठकीत सगळ्यांना नवीन गट सुरू  झाल्याचे कळते.

**सभासद महिला →   बचतगट   → विभाग →   संघ**

अशी साखळी तयार होते. ह्या प्रत्येक टप्प्याची बैठक दरमहा होते. सध्या ५७७७ सभासद ३२० बचत गटात सहभागी आहेत हे १५ विभागात जोडलेले आहेत ज्याचा एक संघ आहे. हे बचत गट ६० गावांमध्ये आहेत. **१२,६७,१००/– रुपये  एवढी बचत दर महिन्याला** सगळे सभासद मिळून जमा करतात. त्यातूनच कोटी–कोटी रुपयाच्या उलाढाली बचतगटांनी केल्या. त्याचा तपशील खाली चौकटीत दिला आहे.

दि. ३१ मार्च अखेर २६६ गटांचे हिशोब झाले. सर्व बचत गटाची आज पर्यन्तची बचत २ कोटी ६१ लाख रुपये झाली. बचत, व्याज, परतफेड अशा जमा झालेल्या रकमेतून ६ कोटी ३० लाख रुपये कर्ज दिले. त्यापैकी २ कोटी ८३ लाख परत आले व ३ कोटी ४६ लाख गटांकडे येणे बाकी दिसते. या व्यवहारात गटाकडे १ कोटी ५१ लाख रुपयाचे व्याज जमा झाले. हे सभासदाचे निव्वळ उत्पन्न आहे.

※ **नव चेतना बैठक :** वेल्ह्यातील दुर्गम भागातील गावात यंदा बचतगट सुरु करायचे ठरवून गट कामाला लागला. वाड्या–वस्तीवर जाऊन बैठका घेतल्या. त्याचा परिणाम म्हणून मार्च१७ पर्यंत १५ नवीन गावात १८ गट सुरू झाले त्यापैकी काही गावे पाल खुर्द, चऱ्हाटवाडी, पाल बुद्रुक, कुंबळे, बोरवाडी, जाधव वाडी, गुहिणी, हिरपुडी, खाटपेवाडी अशी आहेत. या नवीन गटांचा वेल्ह्याला विभागही सुरू झाला. हिशोब करण्यासाठी गावातल्या

**आपण मारदर्शन करत असणार्या गटाचा ३१ मार्च २०१७** अखेर हिशोब

| | विभाग | गट | सभासद | बचत | कर्ज | परत फेड | कर्ज येणे बाकी | व्याज |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | शिवापूर | २३ | ४१९ | ३०३९००० | ७७४१३६५ | ३३६७२५५ | ४३८४११० | १३६४४६४ |
| २ | श्रीरामनगर | २० | ३७८ | ३४४५५८० | ९०४७२३० | ३८११३८१ | ५२३५८४९ | १०४१२१४ |
| ३ | गाउडदरा | २० | ३८७ | ४३९३३०० | ९७३४४४० | ३८७५८४० | ५८५८६०० | २२००१४९ |
| ४ | खोपी | १९ | २८२ | १६४१७०० | ३७९०३६८ | १४०३४५१ | २३८६९१७ | ७९६८५८ |
| ५ | नसरापूर | ३१ | ४८३ | ११३६८५० | ३२२५६८० | १३८३७३० | १८४१९५० | ४८८२३७ |
| ६ | वेल्हे<br>+ नव चेतना | २५ | ४५० | १५४४००० | २९८३३८४ | १३२०२३१ | १६६३१५३ | ५८३४९३ |
| ७ | नवदिशा<br>आंबवणे | ५३ | ९०८ | २१८७९०० | ५६५५७४० | २९७८५५८ | २६७७१८२ | ५४७०४०१ |
| ८ | कुसगाव | १३ | २१६ | ८२०७०० | ३३६३८३१ | १९६७५२३ | १३९६३०८ | ५११६४३ |
| ९ | रहाटवडे | १६ | ३२० | १७३२९६१ | ३३७७८०९ | ११९७९३३ | २१७९८७६ | ५३७७१० |
| १० | कल्याण | ३ | ५० | २२८८०० | ५०७२८८ | २५८८८८ | २४८४०० | ८६६३१ |
| ११ | शिवरे | ३० | ४५८ | ३३९२३०० | ७८४५४२७ | ३६४३३३९ | ४२०२०८८ | १६१२४९३ |
| १२ | रांझे | ७ | ११८ | ५८५६०० | २२५५१९३ | १४७८४७० | ७७६७२३ | १९५१२६ |
| १३ | पुणे | ६ | १३५ | १९५४५०० | ३४३१३०० | १६१४००० | १८१७३०० | २८९०१४ |
| | | **२६६** | **४६०४** | **२६१०३१९१** | **६२९७९०५५** | **२८३००५९९** | **३४६७८४५६** | **१५१७७४३३** |

गटांची जबाबदारी घेणाऱ्या १२ प्रतिनिधी तयार झाल्या. त्यामुळे त्यांच्या गावात कामाला सुरुवात झाली. ८ गावांमध्ये पहिल्यांदाच हिशोबाचे मेळावे झाले. दर महिन्याच्या चौथ्या शनिवारी वेल्हे कार्यालयात त्यांची नव चेतना बैठक सुरु केली.

❊ **नव दिशा बैठक :** आंबवणे परिसरातील गावात बचत गटाच्या माध्यमातून सुरुवात करून इतरही विकास कामे करणे असे गेल्या वर्षी ठरवले आणि आता आंबवणे गावात ७ व परिसरातील १३ गावात मिळून ६२ गट असे एकूण ६९ गट कार्यरत आहेत. या गाव प्रतिनिधींची बैठक दरमहा १२ तारखेला आंबवण्याला होते तर त्या गटांचे ३ विभाग २४ तारखेला होतात. दरमहा लाखो रुपयांची उलाढाल या गट-विभाग व्यवहारातून होते.

**यंदा बचतगटाच्या खूप उलाढाली झाल्या म्हणून गटप्रमुखांच्या आग्रहावरून नोटा मोजायचे यंत्रच खरेदी केले. सगळ्याजणी ते यंत्र वापरायला शिकल्या. नोटाबंदीच्या वेळी त्याचा खूपच उपयोग झाला.**

**बचत गटात आल्यामुळे घरगुती अडचणींवरही बोलले जाते. असेच एकीच्या मुलीला डायबेटीस होता पण घरी फ्रिज नसल्यामुळे एकदम औषध आणता यायचे नाही. मग तिची गरज लक्षात घेऊन पुण्यातल्या हितचिंतकांपर्यंत पोहोचवली तिला थोडासा वापरलेला पण चालू फ्रिज मिळाला.**

## ♦ ६.२ स्वयंरोजगार ♦

❊ **स्वयंरोजगार प्रशिक्षणे :** या वर्षी २ दिवसांचे पणत्या रंगविण्याचे प्रशिक्षण वेल्हे येथे झाले, त्याशिवाय आंबवणे येथे उटणे तयार करणे व पॅकिंग करणे याचे प्रशिक्षण झाले. एक वेगळा प्रयोग म्हणून आंबवणे बैठकीत सॅनिटरी नॅपकिन उद्योग करण्यासाठी माहिती देऊन कापडी सॅनिटरी नॅपकिन तयार करण्यासाठी मार्गदर्शन केले, आंबवणे येथील ३ महिला या उद्योगात होत्या.

❊ **मण्यांचे आकाशकंदील बनवणे :** या वर्षी मणी आकाशकंदिल बनवायचे मोठ्ठ्या प्रमाणावर प्रशिक्षण दिले. साधारण १५० जणी वेगवेगळ्या १६ वर्गांमध्ये शिकल्या व जवळ जवळ १५०० कंदिलाचे उत्पादन केले.

❊ **विक्री व्यवस्था उभारणे : आपली उत्पादने किमान १०० नव्या लोकांपर्यत पोहचविण्यासाठी** दोन व्हॉटस ॲप ग्रुप तयार केले. त्याचा विक्री होण्यास उपयोग झाला. त्यामुळे वर्ष अखेर पुन्हा एकदा विक्री केन्द्र उभे केले. आपल्या प्रयत्नाने रु. ३,६६,०००/- पर्यंत उलाढाल झाली. यामुळे २३ महिलांना उत्पादन विक्रीला देण्याची **नवीन संधी उपलब्ध** झाली.

❊ **काकासाहेब सुपनेकर महिला उद्योजिका पुरस्कार :** गेल्या दोन वर्षांप्रमाणे या तिसऱ्या वर्षीही काकासाहेब सुपनेकर महिला उद्योजिका पुरस्कार ग्रामीण भागातील उद्योजिकांना दिला. यंदाचा मुख्य पुरस्कार वेल्ह्यातील सुरेखा दिघे हिला तर दिपाली कामठे व राजश्री दिक्षित यांना उत्तेजनार्थ पुरस्कार देण्यात आले. कार्यक्रम आंबवण्यामध्ये झाला, त्याला सुपनेकर कुटुंबीय उपस्थित राहिले होते.

❊ **कौशल्य प्रशिक्षण :** मेहंदी, संस्कार-भारती रांगोळी, आकाशकंदील, पणत्या रंगविणे, क्विलींग पेपरचे कानातले, उटणे तयार करणे, पॅकिंग करणे, कापडी पिशव्या बनवणे अशा १० कौशल्यांवर काम केले. नवीन कला शिकण्या पासून आपल्यातली एखादी तरी महिला प्रशिक्षिका होईपर्यत काम केले. याचा परिणाम म्हणुन ३२ प्रशिक्षिका तयार झाल्या व त्यांनी **५०० जणींना शिकवले.**

❊ **पर्यटन सहली :** या वर्षी ७ पर्यटन सहली झाल्या. त्यात १४३ व्यक्ती सहलीला आल्या होत्या. साधारण ९०,०००/-रुपयांची उलाढाल झाली.

❊ **कापडी पिशव्या युनिट :** आंबवणे, शिवापूर येथे साड्यांपासून कापडी पिशव्या शिवण्याचे युनिट चालू केले आहे, त्यात ८०० पिशव्यांचे उत्पादन झाले व त्या पैकी ६०० पिशव्यांची विक्री सुद्धा झाली.

❊ **स्वयंरोजगारातील नवीन प्रयोग :** औषधी वनस्पती संकलन करून पुण्यात विक्री केली. वेखंड लागवड करुन उत्पादकता वाढवता येईल का ते पाहिले. दुग्ध व्यवसायाला कर्ज मिळण्यासाठी मार्गदर्शन केले तर भात लावणी यंत्र आपल्या भागातल्या चिखलात चालवण्याचा प्रयोग करुन पाहिला.

❊ **प्रदर्शन भरवणे : स्वतःचे उत्पादन** विकता आले तरच ग्रामीण भागात महिला उद्योग करू शकतात. ही संधी महिलांना मिळावी म्हणून या वेळी आपण वेल्ह्याच्या बाजारात महिला उत्पादनाचे प्रदर्शन मांडले. अगदी वेल्हे सहनिवासातल्या मुलींना सुध्दा विक्रीकला अवगत व्हावी म्हणून यात्रेत भेळपुरीचा स्टॉल मांडला तर जीवनज्योतीतील मुलींना नसरापूरला स्टॉलचा अनुभव दिला.



❊ **राम-सीता पुराणिक तंत्र निकेतन : -**

| | गाव | प्रशिक्षण तपशील | उपस्थिती |
|---|---|---|---|
| १ | शिवापूर | शिवण व झबले/टोपडे सेट | ३१ |
| २ | श्रीरामनगर | मेंहदी वर्ग | ८ |
| ३ | श्रीरामनगर | मेंहदी वर्ग | ६ |
| ४ | शिवापूर | रांगोळी वर्ग | ८ |
| ५ | शिवापूर | मणी आकाशकंदील | १३ |
| ६ | शिवापूर | मणी आकाशकंदील | १४ |

| | | | |
|---|---|---|---|
| ७ | श्रीरामनगर | मणी आकाशकंदील | ७ |
| ८ | श्रीरामनगर | मणी आकाशकंदील | ७ |
| ९ | शिवापूर | कापडी पिशव्या | १२ |
| १० | शिवापूर | वाखापासून वस्तू बनविणे | १४ |
| | **एकूण** | **१० वर्ग** | **१२०** |



हया दहा वर्गांसाठी ८ नवीन महिलांना प्रशिक्षक म्हणून काम करण्याची सधी दिली. या १२० प्रशिक्षित महिलांपैकी साधारण २५ जणींनी नवीन शिकलेल्या कौशल्यातून स्वंयरोजगार मिळवण्याचा प्रयत्न केला. त्यापैकी यशस्वी होऊन **उल्लेखनीय उत्पादन केलेल्या महिला:**

मणी आकाशकंदील : शुभांगी रेणुसे, पूजा कांबळे, अनिता जस्वाल, मंजुषा शिंदे, श्वेता कुंभार,हर्षदा घोलप, मंदा मोहिते

कापडी पिशव्या : दिपाली भालेराव, नंदा कोंडे

झबले/टोपडे सेट : अश्विनी कांबळे




बहुतेकीनी गटाने एकत्र येउन उत्पादन केले व पैसे मिळवले. काहींनी प्रबोधिनीतून मिळालेली ऑर्डर बनवून पूर्ण केली. या प्रयत्नातून रुपये १९,५७०/- एवढी करणावळ या कालावधीत मिळाली.

| | उत्पादन | करणावळ |
|---|---|---|
| पिशव्या | ६,०००/- | ३,००० /- |
| कंदिल | ३७,५००/- | १०,७५०/- |
| सेट | ७,०००/- | ६,०००/- |
| **एकूण** | **५०,५००/-** | **१९,७५०/-** |

**मेळावा** : कौशल्य प्रशिक्षणानंतर महिला आपापला उद्योग व्यवसाय करतील असे गृहित धरुन चालत नाही. त्यासाठी संधी दिसावी लागते, प्रत्यक्ष काम करण्याचे धाडस असावे लागते म्हणून गेली काही वर्षे आपण राम-सिता पुराणिक तंत्र निकेतनामध्ये मेळाव्यांची योजना करत आहोत. त्या निमित्त असा धडपडणारा गट बांधता यावा हा हेतू. यंदाही दोन सत्रात असे दोन मेळावे झाले. श्रावण महिन्यात व्यवसाय संधी जाणीव जागृती मेळावा घेतला तर नवरात्रात उद्योजकता मेळावा घेतला.

## ♦ ६.३ आरोग्य ♦

या वर्षी आरोग्याची मुख्यतः दोन प्रकारची कामे झाली. यात गरोदर महिलांची तपासणी व स्तनाच्या व गर्भाशयाच्या कॅन्सर विषयीची जाणीव जागृती व तपासणी.

✲ **गरोदर महिलांची तपासणी :** आंबवणे येथील केंद्राला यंदा १२ वर्षे झाली. आता आंबवणे केंद्राचा जम बसला. तेथून १० किलोमीटर अतरावर असलेल्या **साखर गावातील** शासकीय आरोग्य केंद्रात **दुसरे केंद्र डिसेबर पासून चालू झाले** हे विशेष! दोन्ही केंद्रात मिळून यंदा ६४ गावातल्या गरोदर महिला तपासणीस आल्या. वर्षाला ७२० महिलांची तपासणी झाली. या कामासाठी पुण्यातील पाटणकर नर्सिंग होम मधील डॉक्टर व परिचारिकांचा गट डॉ. वैशाली बिनिवाले याच्या मार्गदर्शनाने काम करतो. आवश्यक त्या तपासण्या करुन औषध उपचार करत आहे. यावर्षीही गरोदर महिलांना आपण औषधा बरोबरच शतावरीचे दूध व दाण्याचा लाडू दिला. ज्या माता बाळंतपणा नंतर बाळ दाखवायला येतात त्यांना बाळंतविडाही दिला.

**✲ गरोदर माता तपासणी ✲**

| क्र. | महिना | गरोदर माता | मुल होण्यासाठी |
|---|---|---|---|
| १ | एप्रिल | ४८ | ९ |
| २ | मे | ५४ | ९ |
| ३ | जून | ५० | १३ |
| ४ | जुलै | ५२ | १० |
| ५ | ऑगस्ट | ५२ | ५ |
| ६ | सप्टेंबर | ६४ | १६ |
| ७ | ऑक्टोबर | ६५ | ६ |
| ८ | नोव्हेंबर | ५४ | २ |
| ९ | डिसेंबर | ५४+५ | ४+३ |
| | (साखर गावात तपासणी सुरु) | | |
| १० | जानेवारी | ३९+४ | ६+२ |
| ११ | फेब्रुवारी | ४१+४ | ६+७ |
| १२ | मार्च | ३७+४ | २+३ |






**डॉ. वैशाली बिनीवाले व पाटणकर ट्रस्ट यांनी गेली बारा वर्ष दर महिन्याला गरोदर महिला तपासणीसाठी येणारा सर्व वैद्यकीय खर्च केला व त्यासाठी लागणारे वैद्यकीय मनुष्यबळही उभे केले.**



आता गरोदर माता या तपासणीला आपणहून येतात. एवढ्या वर्षातला बदल म्हणजे आपल्या इथे आलेल्या सर्व जणी दवाखान्यात बाळंत होतात कोणीही बाळंतपण घरी करत नाही. त्यांची बाळे सुदृढ असतात. डॉक्टरांची नियमितता सुध्दा वाखाणण्यासारखी आहे. त्यामुळेच साखर गावाला सुरू झालेल्या दुसऱ्या केन्द्रालाही चांगला प्रतिसाद मिळाला.

※ **जंत निर्मूलन :** शासनाच्यावतीने लहान मुलांचे जंत निर्मूलन केले जाते तसेच ते मोठ्या बायकांचेही करणे आवश्यक असते. हिमोग्लोबिन तपासताना महिला अशक्त आहेत असे लक्षात येते आहे त्याचे कारण **जंत** असेही असू शकते असे आपण पटवून देत आहोत. यंदा अशा जंत निर्मूलनाच्या गोळ्या ६२ कुटुंबांनी आपल्या कडून घेतल्या.

| क्र | महिना | शिबीर संख्या, गाव | उपस्थिती | पॅपस्मिअर |
|---|---|---|---|---|
| १ | एप्रिल २०१६ | २ आंबवणे, विंझर | २६ | १४ |
| २ | मे २०१६ | २ कोदवडी, साखर | २३ | २० |
| ३ | जाने २०१७ | १ मार्गासनी | १५ | ९ |
| ४ | फेब्रुवारी २०१७ | २ घिसर, भाटघर | ४० | २० |
| ५ | मार्च २०१७ | २ वाजेघर, कामथडी | ४५ | २४ |
| | एकूण | ९ गावे | १४९ | ८७ |

※ **कॅन्सर विषयक जाणीव जागृती शिबिरे :** डॉ. शुभांगीताई कानिटकरांच्या पुढाकाराने सुरू झालेले, स्तनांच्या व गर्भाशयाच्या कॅन्सर विषयीच्या जाणीव जागृतीचे काम या वर्षीही झाले. हे काम करण्यासाठी डॉ. कानिटकर स्वतः सर्व गावांना आल्या होत्या. प्रत्येक तपासणी शिबिरात त्यांनी सचित्र माहिती दिली व महिलांची पॅपस्मिअर तपासणी केली. ज्यांना आवश्यकता आहे त्यांना पुढील उपचारांसाठी दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात पाठवले गेले. ह्यावर्षी एकूण ८७ जणींची पॅपस्मिअर तपासणी झाली. कोणालाही कॅन्सर निघाला नाही.

महिला डॉक्टर गावात आल्यामुळे अनेकींनी आपल्या तक्रारी निःसंकोच सागितल्या. त्यात आढळलेल्या इतर कुठल्या तरी आरोग्य समस्येसाठी पुढील उपचाराची गरज होती अशा १४ जणी होत्या. बहुतेक जणींनी त्यावर दवाखान्यात जाण्याची तयारी दाखवली. डॉक्टरांनी वेळेत मार्गदर्शन केले, त्यामुळे ४ जणींवर वेळेत शस्त्रक्रिया करता आली, नाहीतर त्याची परिस्थिती फारच गंभीर झाली असती. चौघींनी यासाठी गटातून कर्ज काढले. बचतगटामुळे हक्काच्या मिळालेल्या कर्जाचा, स्वतःच्या आरोग्यासाठी वापर करावा असे वाटण्या इतके आपण प्रबोधनाचे काम केले आहे, अशी पावती या निमित्ताने मिळाली, हे विशेष!

## ♦ ६.४ नेतृत्व विकसन ♦

※ **नवरात्र मेळावे :** ३२ गावांमध्ये नवरात्र मेळावे घेण्यात आले. सर्व गावातील मेळाव्यात सहभागी झालेल्या महिलांची संख्या १९६५ होती. विशेष म्हणजे या वर्षी मेळावे घेण्यासाठी ९० जणी सहभागी झाल्या. या मेळाव्यात प्रबोधिनीच्या वेगवेगळ्या प्रकल्पांची माहिती सांगणे, विविध खेळ व उपवासाचे पदार्थ बनवण्याची स्पर्धा घेणे असे कार्यक्रम होते. स्पर्धेनंतर बक्षिस वाटप तर झालेच पण त्यानंतर हळदीकुंकू देऊन खाऊ वाटपही केले.

※ **संक्रात मेळावे :** २७ गावांततून १४०० महिलांसाठी ६५ कार्यकर्त्यांनी हे मेळावे व्यवस्थितरित्या पार पाडले. या वर्षी शिवरे, खोपी, कासुर्डी, सांगवी, निधान, गाऊडदरा या गावातून १०% निधी ग्रामपंचायती मधून मेळाव्यासाठी मिळाला होता.

※ **वार्षिक हिशोबाचे मेळावे :** बचतगट सुरु झाल्यापासून ३१ मार्च पर्यंतचा प्रत्येक सभासदाचा बचतगटामध्ये झालेला व्यवहार त्या त्या गावातल्या सगळ्यां समोर सांगणारा हिशोब मेळावा आपण दरवर्षी आयोजित करतो. यंदाचे हे असे हिशोबाचे १० वे वर्ष! असे मेळावे या वर्षी ९ गावात झाले. त्यासाठी त्या गावात हिशोबाचे काम करणाऱ्या ज्या बचतगट प्रमुख असतात त्या पुढाकार घेतात. या वेळी सर्व सभासदांचे हिशोब तपासले जातात व त्यावर हिशोब मान्य असल्याच्या सह्या सभासद करतात, एखादीच्या नोंदीत काही चूक झाली असेल तर तपासायची ही वार्षिक संधी असते.

※ **सहल :** ग्रामीण महिलांची दृष्टी विस्तारावी यासाठी आपण फक्त महिलांच्या सहलींचे आयोजन करतो. या वर्षी भाटघर येथील ४५ महिलांची पहिल्यांदाच एक दिवसाची अष्टविनायक येथे मुक्कामी सहल गेली होती. तर आंबवणे परिसरात गाव पातळीवर नेतृत्व करणाऱ्या १८ सदस्यांची सहल मुंबई येथे काढली होती. भारती खासबागे व बागेश्री पोंक्षे या सोबत गेल्या होत्या. मुंबईला गेलेल्या या सहलीतील बहुतकींनी प्रथमच समुद्र पाहिला, बोटीतून प्रवास केला. त्यांनी प्रबोधिनीच्या बोरीवली केंद्राला भेट दिली व त्यांच्या सभासदांकडे मुक्काम केला. ज्या ठिकाणी प्रबोधिनीचे २० वर्ष काम आहे पण ऑफिस नाही अशांकडून मनुष्यघडणीसाठीचे काम करणे ही संकल्पना नीट समजून घेतली.



ग्रामीण महिलांचे काम पूर्णवेळ करणारा गट म्हणजे सुकाणू गट! या गटाची कन्याकुमारी येथे २ ते ८ नोंव्हे २०१६ या कालावधित अभ्यास सहल गेली होती. १६ कार्यकर्त्यांचा कन्याकुमारी–बंगलोर

येथे ७ दिवसाचा अभ्यासदौरा झाला. तपशील स्वतंत्र लेखात दिला आहे.

❊ **सहल :** १८ गाव प्रतिनिधींची एक वेगळी सहल काढली होती. जुन्नरला असणारी गोवर्धन डेअरी पाहण्यासाठी नवदिशा बैठकीतील सदस्यांना नेले. चारा घालण्यापासून ते दूध काढण्या पर्यंत सगळी कामे यंत्राने होतात. अशी अतिशय मोठी यांत्रिक डेअरी दाखवण्याचा उद्देश असा होता की ज्या गोष्टीची कल्पनाच कधी केली नाही, असे काहीतरी भव्य, वेगळे, प्रत्यक्ष बघणे. त्यामुळे जगण्या-वागण्यात, नवीन गोष्टी स्वीकारण्यात एक मोकळेपणा येतो असा अनुभव आहे.



❊ **जेंडर बजेट कार्यशाळा :** जेंडर बजेट म्हणजेच महिला केन्द्री अर्थसंकल्प! शासनाने गावपातळीवर असा अर्थसंकल्प करावा असे सांगितले पण कसा करावा हे सांगितले नाही. असा अर्थसंकल्प कसा करायचा याचे प्रशिक्षण देण्यासाठी आपण वैकुंठ मेहेता इंस्टीट्युट ऑफ कोऑपरेटिव्ह मॅनेजमेंट् यांच्या सोबत जीवनज्योती आंबवणे येथे एक कार्यशाळा घेतली. त्याला इंस्टीट्युट मधून डॉ. मेधा दुभाषी, वेल्ह्याचे गट विकास अधिकारी (बी.डी.ओ.), स्टरलाईट टेक फाऊंडेशनच्या कार्यकारी विश्वस्त ज्योतीताई अगरवाल यांनी मार्गदर्शन केले. ग्राम पंचायतीत निवडून आलेल्या महिला सरपंच, उपसरपंच, ग्रामपचांयत सदस्या अशा ५० जणींचे प्रशिक्षण २४ जानेवारीला झाले. या वेळी विविध योजनांची माहिती देऊन, ग्रामीण महिलांचे प्रश्न या माध्यमाने कसे सोडवता येतील असे बोलणे झाले व शिवऱ्याच्या सरपंच रुक्मिणीताई पवार यांनी ग्रामसेवकाच्या मदतीने हे काम कसे केले असे अनुभव कथनही केले.

❊ **पुणे-नायगाव वाहन फेरी :** सावित्रीबाई फुले यांच्या जयंती निमित्त केवळ महिलांची पुण्यापासून साताऱ्यातील त्यांच्या नायगाव या जन्म गावी वाहन फेरी आयोजित केली होती. यात एकूण ८९ महिला सहभागी झाल्या होत्या. त्यात शिवापूर-वेल्हे-आंबवणे भागातल्या कार्यकर्त्या, बैठक सदस्या व कासुर्डी गावातील कातकरी वस्तीवरील ३१ महिला व ९ युवती अशा एकूण ४२ जणी या फेरीत सहभागी झाल्या होत्या. नायगावचे सावित्रीबाई यांच्या जीवनावरील शिल्प प्रदर्शन पाहिले. तेथेच त्यांच्या जीवनातील काही प्रसंगाचे वाचनही केले. त्यांच्या जन्मगावी गेल्यामुळे ग्रामीण महिलांनाही त्या काळात अशा भागात वाढलेल्या बाईला काम करणे किती अवघड गेले असेल याचे भान आले. गटाला प्रेरणा मिळाली.





❊ **एकल महिला मेळावा :** दक्षता समितीने सुरु केलेल्या कामामुळे लक्षात आले की कुटुंबात रहाण्याऱ्या एकट्या महिलांना वेगळे प्रश्न येतात म्हणून त्यांचे स्वतंत्र मेळावे योजले. दि. २५ मार्च या दिवशी महिलादिना निमित्त मेळावा घेतला. बचत गटाचे काम चालू असणाऱ्या २२ गावातून ९१ महिला आल्या होत्या. नवरा नाही, घरची परिस्थिती बिकट आहे अशा महिला पंचायत समितीतून मिळणाऱ्या काही योजनांच्या लाभार्थी होऊ शकतात. ही माहिती त्यांना सांगितली. संजय गांधी निराधार योजनेतून दरमहा रु ६००/- मिळण्यासाठी लागणारी ४० जणींची कागदपत्रे पूर्ण केली. काहींना कुटुंब विमा योजनेचे एक रकमी रु २०,०००/- मिळवण्यासाठी आपण प्रयत्न केले. शासकीय कार्यालयात जाण्यासाठी या प्रयत्नामुळे अनेकीना मनोबळ मिळाले.



# नोटाबंदी : एक आपत्कालीन मदतकार्य

दि. ८ नोव्हेंबर २०१६ रोजी रात्री ८.३० वाजता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'आज रात्री १२ नंतर ५०० व १००० च्या नोटा चलनातून बाद केल्या जातील'असे जाहीर केले. दि. ३१ डिसेंबर २०१६ पर्यंत हे चलन बँकेत भरता येणार आहे असेही सांगितले. या निर्णयाचा ग्रामीण जन जीवनावर खूप मोठ्ठा परिणाम होणार होता कारण ग्रामिण भागात बहुतेक व्यवहार फक्त रोखीनेच होतात.

१९९५ साली महिला बचतगटाच्या कामाला सुरुवात केली. तेव्हापासून आर्थिक साक्षरतेच्या कामालाच सुरुवात झाली होती. पंतप्रधानांनी असा निर्णय घेऊन आपली अचानक परीक्षा घेतली आहे असे वाटून निर्णय जाहीर केल्या क्षणीच बचत –गटाच्या कार्यकर्त्यांचा गट कामाला लागला.

गेल्या २०–२२ वर्षांच्या कामामुळे ग्रामीण भागातल्या या महिला आता विश्वासाने पैसे हाताळत होत्या. ५००/१००० रु. चे चलन बँके खालोखाल कदाचित बचतगट प्रमुखच हाताळत असतील... असा आमचा प्राथमिक अंदाज होता.

पंतप्रधानांनी नोटबंदी हा निर्णय असा लागू केला की कोणालाही त्याच्या उपायावर नियोजन करण्यासाठी अवधीच मिळाला नाही. हे आर्थिक संकट पेलून त्यावर कार्यकर्त्यांनी नियोजनपूर्वक काम करायचे ठरवले. गावोगावच्या ग्रामस्थांपर्यंत हा निर्णय 'सार्थ' पोचवून मदत करायची ठरलं.

उपाय म्हणून काय केले तर,

अनेक गावच्या प्रमुख महिला ज्या एरवी बचतगटाचे बँकेत मोठ्ठ्या रकमेचे व्यवहार करतात अशा महिलांची ९ नोव्हेंबरलाच सकाळी तातडीची बैठक बोलावली. ८ ला रात्री उशिराच फोनवर निरोप दिले तरीही १२ गावाच्या १२ प्रमुख, ज्यांना या विषयाचे गांभीर्य समजत होते अशा हजर झाल्या. त्यांच्याच शब्दात सांगायचे तर या 'आर्थिक सुनामी'च्या मदतकार्यास त्या पदर खोचून तयार होत्या.

ज्यांच्याकडे व्हॉटस ॲप असणारे फोन होते, त्यांनी गटातल्या महिलांना बैठकीला येण्यापूर्वी 'घाबरू नका थांबा! आपण उपाय करू, बैठक झाली की काय करायचे ते सांगते' अशा आशयाच्या सूचना दिल्या होत्या.

दि.९ नोव्हेंबरला 'बाहेर'च्यांना व्यवहारासाठी बँका बंद असल्या तरी आपण ज्या भागात काम करतो त्या भागातल्या राष्ट्रीयकृत बँकेत कार्यकर्त्या 'आतून' भेटायला गेल्या. बँक शाखा व्यवस्थापकांना कार्यकर्त्यांनीच मदतीचा हात दिला. योगायोगाने बँक शाखा व्यवस्थापक महिला होत्या. त्यांनी काही बाबी कार्यकर्त्यांना सुचवल्या. बँक शाखा व्यवस्थापकांनी सांगितले की अजून किमान ५ दिवस तरी गावकऱ्यांना बँकेत गर्दी होऊ नये म्हणून बँकेत न येण्याची विनंती करा.

एकेका गाव प्रतिनिधीला गावकऱ्यांकडून गावातच भरुन घेण्यासाठी डिपॉझिट स्लिप (साधारण ३००) दिल्या. त्यांनी स्लिप भरून, पैसे मोजून, नोटा एकत्र लावून बँकेत आणायाच्या म्हणजे बँकेतली गर्दी टळेल असेही संगितले.

ज्या गटांची कर्जफेड बाकी आहे त्या गटातल्या सदस्यांनी बँकेतले व्यवहार कमी संख्येत व्हावेत म्हणून शक्यतो एकरकमी गटाची कर्ज फेड आधी करावी असे सुचवले म्हणजे २० जणींच्या २० बचत खात्यात डिपॉझिट एन्ट्री करण्या ऐवजी १ एन्ट्री करून २० जणींकडचे बाद चलन बँकेत जमा होउन सगळ्यांचे काम होईल.



नोटा तपासणारे व मोजणारे यंत्र गावोगाव वेळापत्रक लाऊन नेले. मशीनवर नोटा कशा मोजायच्या हे महिला जबाबदारीने शिकल्या

एवढेच काय पण दि. १० नोव्हेंबरला किंवा नंतरही बँकेत काही दिवस अनियंत्रित गर्दी उसळू शकते म्हणून बँकेने पोलीस प्रोटेक्शन मागितलेच होते अशी माहिती देऊन व्यवस्थापक म्हणाल्या, 'दक्षता समितीतील महिलांना' गरज पडल्यास फोन केला तर लगेच आमच्या मदतीला या' असा निरोप आधीच देऊन ठेवा.

या सगळ्यावर बैठकीत चर्चा झाली. कार्यवाही कशी करायची याची रणनीती आखली गेली. अगदी स्थानिक रोख पैसेवाल्यां पासून सावधानतेचा इशाराही देण्यात आला. सेन्ट्रल बँक व विजया बँक या राष्ट्रीय बँकेसोबत काम करायचे ठरले. बैठकीत असणाऱ्या भारती खासबागे (सेन्ट्रल बँक) व भारती कामठे (विजया बँक) अशा कोऑर्डीनेटर ठरवल्या. बाकी अडचण आल्यास कार्यालय प्रमुख आशा सुर्वे यांना संपर्क करायचा असे ठरले.

हा कार्यक्रम राबवताना स्थानिक बचतगट महिला प्रमुखांना प्रशिक्षण दिले. कार्यकर्त्यांशी बोलताना असे लक्षात आले, की या नोटबंदीच्या प्रसंगामध्ये बचतगटाच्या निमित्ताने झालेली आर्थिक साक्षरता महिलांना खूपच उपयोगी पडते आहे. एका अर्थाने आम्हीच अर्थिक साक्षरतेच्या मोहिमेत पास झालो आहोत असेही वाटले! गावातला शिकलेला माणूस सुद्धा बँकेत जाण्यापूर्वी आमच्या कार्यकर्त्यांचा सल्ला या काळात घेत होता.

या निमित्ताने काही बचत गटांचा अभ्यास केला, ग्रामीण बँकेत जिथे महिला बचत गटाचे व्यवहार करतात अशा शाखाधिकाऱ्यांच्या भेटी घेतल्या, काही स्थानिक पुढाऱ्यांशी चर्चा केली त्यात अनेक नव्या गोष्टी लक्षात आल्या की ज्या पेपर मधे येत नव्हत्या. त्या अशा की:

१. पंतप्रधानांनी ज्या वेळी घोषणा केली त्या नंतर लगेच दुसऱ्या दिवशी 'चलनात नसणाऱ्या ५००, १००० च्या नोटा द्या व निम्मे पैसे घ्या' असे म्हणणारे काही जण गावात दाखल झाले. ते कारण असे सांगत होते की सरकार तुमचे फक्त ४०००/– च बदलून देणार आहे! पण रोज ४००० हे

ते सांगत नव्हते, अर्धवट माहिती देऊन अनेकांना गुपचूप फसवण्याचे उद्योग सुरु झाले. पण ज्या गावात नियमित बँकेत गेल्यामुळे लोकशिक्षणातून आर्थिक साक्षर झालेल्या महिला होत्या, आमच्या कामावर विश्वास होता, तिथे असे फसवणे शक्य झाले नाही. जरी या महिला, वर्तमानपत्र वाचण्याइतक्या साक्षर नव्हत्या तरी या संदर्भातली चोख माहिती मिळण्याचे 'संपर्क' त्यांच्याकडे होते म्हणूनच केवळ ती कुटुंबे फसली नाहीत व त्यांनी इतरांनाही बँक मॅनेजरशी बोलून धीर दिला व असे अर्धवट माहितीमुळे होणारे अनेक गावांचे नुकसान टळले. 'काळा पैसा' हा रंगाने कधीच 'काळा' नसतो अशी माहितीही वेळेत योग्य त्या गटापर्यंत पोहोचवली. अगदी एखाद्या सासुरवाशिणीने किंवा म्हातारीने लपवून केलेली थोडीफार बचत सुद्धा 'काळा पैसा' नाही असे सांगून 'ती'ला आधार देऊन बँक व्यवहारात तिची बचत बदलून दिली.

ज्या महिलांनी बचत गटात सहभाग घेतल्यामुळे जन-धन योजनेला प्रतिसाद देऊन स्वतःचे बँकेत खाते काढले होते,त्या कुटुंबाची ५०० व १००० रुपयांच्या चलनातली रक्कम त्यांच्या-त्यांच्या खात्यात जमा केली.'ती'चा क्षमता विकास झाल्यामुळे कुटुंबाने 'ती'च्यावर दाखवलेला विश्वास या निमित्ताने 'सार्थ' झाला होता.

घरात बचत गटाचे कोणीतरी सभासद आहे अशा कुटुंबांचे अडले नाही. बचत गटामुळे लाखो रुपये विनाताण बँकेत जमा झाले. या कालावधीत नवीन खाती काढून घ्यायला परवानगी नव्हती. त्या खात्यांची 'एन्क्वायरी होईल' अशी भीतीही वाटत होती.

बँक व्यवस्थापिकेने सांगितले तसे बरेच काही केले.

गावातून डिपॉझिट स्लिप भरून आणल्या. कुठेही छापील पत्रक न वाटता हे निरोप तोंडी गावातल्या सगळ्यांपर्यंत समजतील असे केले.

गावकरी बँकेच्या निरोपा प्रमाणे थांबले. अडचण आल्यावर लोक फक्त टीव्हीवरच्या बातम्याच बघत असले तरी गावातले व्यावहारिक प्रश्न सामूहिक गटासोबत चर्चिले जात होते. लोकशिक्षणाचे हे सगळ्यात प्रभावी माध्यम बनले.

स्लिप भरायला बँकेत सुद्धा मदत केली. स्लिप भरायला 'आमच्या'महिला/मुली बँकेच्या आवारात बसल्या. त्यातही ४५ वया पुढच्या ज्येष्ठ लोकांना जास्त मदत करावी लागली. तशी मदत केलीही. ही मदत अधिक साक्षर आहे म्हणून केलेली नव्हती तर बँकेसंबंधी कागद भरायला लागणारी वित्तीय साक्षरता होती. जी या काळात पुन्हा-पुन्हा केल्याने अनेकींनी आत्मसात केली. हे काम विना मोबदला केले, लोकांच्या अडचणीचा फायदा घेऊन बरेच पैसे मिळाले असते तरी ते टाळून.

या शिवाय बैठकीला आलेल्या सगळ्या जणी त्यांच्या मैत्रिणींसह व्हॉटस ॲपने जोडलेल्या होत्या. त्यामुळे संदेश वहन अतिशय पटापट होत होते. या प्रक्रियेतली लोकशिक्षणाची अजून एक महत्त्वाची बाजू लक्षात आली ते म्हणजे आपत्कालीन प्रसंगी कसे वागायचे हे शिक्षण देवाण-घेवाणीतून झाले. त्यात एकटेपणाची भावना नव्हती. गटाच्या एकोप्याने वाढलेला आत्मविश्वास होता. या काळात हा गट रोजच्या घडामोडी व्हॉटस ॲप गटावर टाकत होता. गटावरचे संदेश साधारण असे होते. 'आज २२ स्लिप भरल्या', 'आज धनगराची मानस (एरवी गावात न वावरणारी) विचारत होती', 'गावातले पुढारी घरी येऊन गेले.', 'वरच्या आळीतल्या ३ घरच्या नोटात खोट्या नोटा होत्या', 'रोजच्या सकाळ संध्याकाळ बातम्या बघते', 'आज मी बँकेतून ४००० आणले, आता २ हजारां ऐवजी ४ हजार मिळायला लागले', 'माझं घर जणू गावातली बँक झालिया. मी लिखाणात गुंतून पडले तर आमच्या घरी पारुबाईने जेवण पाठवलं', 'काही माणसं 'बँकेत जाऊ नका' म्हंटलं तरी ऐकत नाहीत, पण बाकीच्यांनी आपला शब्द मानला. त्यांचे पैसे रांगेत न थांबताच खाते पोच झाले. असे ते सांगत होते' असे संदेश वाचायला मिळाले.



आलेल्या अडचणी वरही चर्चा होतीच त्यात मुख्य प्रश्न लक्षात आला तो म्हणजे खोट्या नोटांचा! ज्याचा विचार किंवा उल्लेख तोपर्यंत कुठल्याही माध्यमांनी केला नव्हता. ज्या गावात बचतगटाचे काम करणाऱ्या,जबाबदारी घेणाऱ्या महिला होत्या, त्यांनी संस्थेतले नोटा तपासणारे व मोजणारे यंत्र गावोगाव वेळापत्रक लाऊन नेले. मशीनवर नोटा कशा मोजायच्या हे त्या जबाबदारीने शिकल्या. गावाकऱ्यांचा 'माझ्याकडे असलेली नोट खोटी तर नाही ना?' या धास्तीचा त्यांनी भार हलका केला. प्रत्येक गावात १०-१५ तरी खोट्या नोटा सापडल्या. या सेवेचेही त्यांनी किंवा संस्थेने पैसे घेतले नाहीत. पण आम्ही मशीन वर खर्च केलेले पैसे या १० दिवसात लोकांच्या दुव्यांमुळे वसूल झाले असे वाटले.

महिलांचे या प्रक्रियेत खूपच शिक्षण झाले. वेळेत व विश्वासार्ह माहिती मिळणे/मिळवणे किती महत्त्वाचे हे त्यांनी अनुभवले. 'आवश्यक ती माहिती विचारली तर मला कोणी तरी नक्की सांगेल' या विश्वासामुळे 'ती'चं काम सोपे झाले. बचतगटाच्या कामासाठी नियमित बँकेत जात असल्यामुळे कामात सहजता होती म्हणून गावातल्या अनेक पुरुष मंडळीनी सुद्धा त्यांचे प्रथमच ऐकले. या शिक्षणातून त्यांचा आत्मविश्वास लक्षणीय वाढला. गटात होते म्हणून निभावले असं म्हणणायांना अडी-अडचणीला गटाची ताकद कामी येते असा विश्वास पुन्हा एकदा मिळाला.

५-६ दिवसांनी बँकेतली गर्दी आटोक्यात आली. मग एकेका गावच्या ग्रामस्थांना आळीपाळीने बँकेने बोलावणे धाडले. बँक व्यवहाराची गती वाढावी म्हणून संस्थेचे नोटा मोजायचे यंत्रच व्यवस्थापकांच्या आग्रहामुळे बँकेत नेले, त्यामुळे गर्दीच्या दिवसात बँकेत एक काऊटर नव्याने उघडता आला.

या सगळ्यांच्या प्रयत्नामुळे परिस्थिती अतिशयच नियंत्रणात राहिली. आपण नक्की कुठे पडतो हे ग्रामीण महिलांना समजले. बँक मेनेजर म्हणजे

कोणी तरी फार भारी असे वाटेनासे झाले. त्याविषयी भीति चेपली. या महिलांना इ–बँकिंग साक्षर केले पाहिजे असे बँक व्यवस्थापकांनाही मनापासून वाटले त्यामुळे त्यांनी तातडीने ज्या महिलांनी पहिल्या टप्प्यात जन–धन मध्ये बचत खाती काढली होती, त्यांना (गावात जाऊन)– एटीएम् कार्ड वाटप केली. –एटीएम कसे वापरायचे हे शिकवले. मग गट प्रमुखांनी पुढच्यांना शिकवले. अगदी पिन कसा बदलायचा हे सुद्धा शिकवले. तेव्हा बँक व्यवस्थापकांनी न सांगितलेला 'हा नंबर कोणाला सांगू नका नाहीतर कोणीही पैसे काढू शकेल'असा सल्लाही दिला, जो व्यावहारिक शहाणपणाचा निदर्शक होता. या शिक्षणाची/माहितीची गरज इतकी होती की हे 'संसर्ग'झाल्या सारखे दुर्गम खेड्यापाड्यात पसरले. ज्याला हवे होते तो या ज्ञानगंगेत सामील होत होता नि दुसऱ्याला देत होता ....... कधी ते जीप मधल्या प्रवासात, तर कपडे धुताना ओढ्यावर, कधी पाणी भरताना विहिरीवर तर कधी पोराला शाळेत सोडायला जाता–येता रस्त्यात, असे हस्तांतरित झाले. नोटाबंदीच्या काळात चलन उपलब्ध नाही, जनतेचे हाल होत आहेत, एटीएम बाहेर रांगच रांग ..... अशा प्रकारच्या फक्त नकारात्मक बातम्यांची चर्चा वतमानपत्रात, टी.व्ही. चॅनेल होत असताना वाटलं आर्थिक साक्षर झालेल्या महिलांनी सारं निभावलंय!

## *कार्यकर्त्यांचा कन्याकुमारी अभ्यासदौरा!*

ग्रामीण भागात नियमित काम करणाऱ्या आम्ही १६ कार्यकर्त्या २–८ नोव्हेंबर २०१६ कालावधीत कन्याकुमारी–बंगलोर दौऱ्याला गेलो होतो. दिवाळीच्या दुसऱ्या दिवशी पोरांची सुट्टी चालू असताना घराबाहेर पडायचे म्हणजे खरीच कसोटी होती. ४–५ जणी पुण्यातल्या, बाकी सगळ्याच ग्रामीण भागात रहाणाऱ्या. त्यामुळे घरची परवानगी काढण्यापासून आजूबाजूच्या चार जणींना विश्वासात घेऊन निघायचे, हेही काम यादीत होतेच. आणि २ तारीख उजाडली!

पुणे स्टेशनहून संध्याकाळी ६.४० ला गाडी सुटणार होती. ६ पर्यंत साऱ्यांनी पोहोचायचं ठरवले होते. वेल्हेकर मंडळी तर उगाच उशीर नको म्हणून दुपारी २ वाजताच निघाली होती. आणि सगळ्याजणी हातची वेळ राखून ट्रॅफिक जॅम असला तर म्हणून लवकर निघून पोचल्या. हा दौरा जबाबदार कार्यकर्त्यांचा आहे हे त्यामुळे लगेचच लक्षात आले. एखादा अपवाद वगळता कोणालाही कोणी पोचवायला आले नव्हते! पुणे स्टेशनवर असणाऱ्या एस्कलेटरवर आयुष्यात पहिल्यांदाच चढताना ...नवीन अनुभवायला हिम्मत करुया असे म्हणत दौरा सुरू झाला. पुणे स्टेशनहून एरनाकुलं पर्यंत जाणारी गाडी संध्याकाळी ठीक ६.४० ला निघाली. विखुरलेली वेगवेगळ्या ठिकाणाची तिकिटे संवाद कौशल्य वापरून एकत्र आणण्यात काही अंशी यश आले. त्यामुळे निदान गटागटात बसता आले. मजेत प्रवास झाला नि दि. ७ नोव्हें. ला रात्री ७.२० ला एरनाकुलं उतरलो. मग एकत्र येऊन नमस्ते झाले व स्वच्छ स्टेशन वर दौऱ्याची पहिली बैठक झाली. या दौऱ्यातून माझी अपेक्षा प्रत्येकीने व्यक्त केली. १६ जणींच्या २१ अपेक्षांची यादी झाली. मग जेवण करायचे होते. प्रत्येकीने ५० रुपयात आपापले जेवण करावे असे ठरले. एरवी भात–भाकरी खाणाऱ्या सगळ्यांना त्याशिवाय कशाकशाने पोट भारता येते हे पहाणे ही सुद्धा गम्मत होती. मग आपसूक गट झाले. हे काय असते? ते कसे असते अशा चर्चा होत नवनवीन पदार्थ खात पोट भरले. हा भोजन प्रमुख आशाताई यांनी दिलेला वेगळाच अनुभव होता. नवीन ठिकाणी गेलो की सगळेच नवीन होते. स्टेशन वरची स्वच्छता तर जाणवलीच पण स्टेशन वर हॉस्पिटल सुद्धा होते असे पाहिल्यावर आरोग्य खाते बघणाऱ्या गंगुताई नि शैलाताई तेथे डोकाऊन आल्या. पुढची गाडी रात्री ११ ची होती. गाडी वेळेत आहे ना? हे कसे बघायचे ते गटाला मोबाईलवर **ट्रेन ट्रॅकर** वर दाखवले. वेळेत आलेल्या गाडीने रात्री झोपून सकाळी ६ ला नागरकोइल येथे उतरलो. तिथून कन्याकुमारी १८ किमी. दूर होते. प्रवास खाते सांभाळणाऱ्या दौरा प्रमुख भारतीताई खासबागे यांनी २ जीप ठरवल्या व आम्ही विवेकानंद केंद्र कन्याकुमारीला पोचलो. गाडीवाल्याला चुकून जास्त पैसे दिले पण त्याने ते इमानदारीत परत केले. समृद्ध समाजात असेही होते असा वेगळा अनुभव आला. विवेकानंद केंद्रात आधीच खोलीचे आरक्षण केले होते तिथे मुक्कामाला गेलो. सकाळी सकाळी चहावाला कुठेच दिसेना पण टोपलीत गरम गरम दूध विकणाऱ्या बायका मात्र दिसल्या... जरा वेगळेच वाटले. तासाभरात सारे आवरून शिलास्मारक बघायला निघालो. अनेकींचा छोटासा असला तरी बोटीचा हा पहिलाच प्रवास होता. मजा आली. शिलास्मारकावर पोचलो. ..... शिलास्मारक पाहिले!! विवेकानंद इथे कधी आले त्याची माहिती ऐकली. सभामंडप पाहिला. स्वामीजींची भव्य तेजस्वी मूर्ती पाहिली. एरवी देवळात असणारी गर्दी, हारतुरे इथे नव्हते. पण वातावरण मात्र सुगंधित होते. मग खाली उतरून ध्यान मंदिरात गेलो, थोडावेळ गटाने ध्यान केले. ध्यान मंदिर तर फारच आवडले. पार्श्वभूमीमध्ये संथ गतीने ऐकू येणारा ओंकार मनात साठवून घेतला. चित्ताला स्वस्थता मिळाली. दौरा पावला असे वाटले. स्मारकाला तीन बाजूंनी घेरणारा समुद्र पाहिला, छोटी प्रदर्शनी पाहिली. तिथे खूप मराठी पर्यटक आले होते, हे पेहेराव व भाषेवरून लगेच लक्षात आले. मग पुस्तके खरेदी केली. नि परत बोटीने किनाऱ्यावर आलो. केंद्रात परतलो.

केंद्राचे ग्रामीण भागात काम करणारा विभाग म्हणजे नार्डेप, तिथे गेलो. नर्सरी तंत्र, गच्चीतील बागकाम, अझोला हे पाहिले मग दंतमंजन उत्पादन पाहिले. तिथे चक्कर मारताना सगळ्यांच्या लक्षात आले की आंब्याच्या झाडाला दिवाळीतच आंबे लागले आहेत म्हणजे इथे दुबार आंबे येत असणार! आणि ते खरंही होतं. मग आंबा चाखून पाहिला की हा दुबार आंबा खरच आंबट लागतो का?... तर लागत होता. तिथून जवळच्या ग्रामीण प्रशिक्षण केंद्रावर गेलो. तिथे विटांनी बांधलेली पर्यावरण पूरक प्रशिक्षण केंद्रे पाहिली. २ विटांची हवा खेळती रहाणारी भिंत कशी बांधायची ते पाहिले. जाड स्लॅब ऐवजी काय काय वापरता येईल ते पाहिले. अगदी बाटलीने बांधलेली दिसायला सुंदर असणारी भिंत पाहिली. प्रिकास्टींग करून पायऱ्या/ छप्पर कसे बांधले होते तेही पाहिले एवढेच नाही तर एनर्जी पार्क मध्ये घरगुती करता येणारे बायोगॅस पाहिले ते कसे पटकन जुंपणी करून बनवता येतात ते सुद्धा पाहिले. दीर्घकाळ लोकाभिमुख काम करणारी संस्था असली की किती बारकाव्याने विचार केला जातो हे पाहिले नि विवेकानंदांचे नाव घेणारी संस्था असली कि कार्यकर्त्यांची भाषाही आपल्या सारखीच असते हेही अनुभवले!



रात्री बैठक झाली. गटातल्या वयाने लहान असणाऱ्या ४–५ जणी अशा प्रकारच्या दौऱ्याला प्रथमच आल्या होत्या. बाकी सवयीच्या होत्या त्यामुळे, दौऱ्याचे पत्रक काढले नव्हते की पूर्वतयारीच्या बैठका घेतल्या होत्या तरीही पहिल्या दिवशी काल काय नवीन पाहिले–अनुभवले यावर तासभर बोलणे झाले. 'प्रशिक्षण केंद्रातला पाटा–वरवंटा वेगळ्याच घाटाचा होता', 'इथे लोक चहा पित नाहीत तर कॉफी पितात', बहुतेक मोठी मंडळीसुद्धा दूध पितात हे पाहून आश्चर्य वाटले. अशा निरीक्षणांपासून खळखळणाऱ्या समद्रात असलं तरी ध्यान मंदिर किती शांत होतं, कार्यकर्ते तोडक्या मोडक्या हिंदीत बोलत होते तरी सगळं कळंत होत, कोणी शिष्ठ वाटलं नाही अशा निरीक्षणांपर्यंत वेगवेगळी निरीक्षणे नोंदवली गेली. सहविचारी संस्था म्हणजे काय? नवीन ठिकाणी काय नि कसे बघायचे सारे सारे चर्चेत आले. घरापासून दूर अनेक नवीन गोष्टींची दखल घेतली गेली होती. रोजची अवधाने नसल्याने वेगळीच तरतरी होती.

दुसऱ्या दिवसाची सुरुवात केंद्रातल्याच प्रार्थना मंदिरात उपासनेने झाली. त्या नंतर लगेचच जीवनव्रती कल्याणीताई यांना घेऊन विवेकानंद केंद्राचे ज्येष्ठ कार्यकर्ते मान्यवर मामाजी आले. दोघांनी मिळून केंद्राच्या अन्य कामाचा परिचय करून दिला. जीवनव्रती क्वचितच घरी जातात, केंद्र हेच त्यांचे घर हेही समजले. विवेकानंदांच्या विचारातून अगदी छोट्या छोट्या गोष्टीमध्ये सुद्धा मनुष्य घडणीसाठीचे काम म्हणजे काय काम करावे लागते ते ताईनी सांगितले. पूर्वांचलामध्ये महिलांसाठी चालणारे काम व शिक्षणाचे काम कसे करावे लागते ते त्यांनी उलगडून सांगितले. हे सत्र खूपच प्रेरणादायी झाले.

केंद्रातली प्रदर्शनी पाहिली, जिथे ग्रामीण विकासातल्या अनेक गोष्टी उलगडून दाखवल्या होत्या. त्यातील पाणलोट विकासाची कल्पना मॉडेलमुळे नीट समजली. आयुर्वेदानुसार जगायचे म्हणजे काय व कसे हेही त्या प्रदर्शनीमुळे नीट कळले. असा माहितीचा साठा घेऊन निघालो. एखाद्या संस्थेने ५०० लोक राहू शकतील असा 'निवास' चालवायचा म्हणजे किती विशेष हेही काहींच्या लक्षात आले. आपल्याकडे ५–२५ पाहुणे आले तर होणारी तारांबळ हजारो लोक सांभाळताना सुद्धा होत नाही हे जवळून पाहिले.

संध्याकाळी कन्याकुमारी देवळात दर्शनासाठी गेलो. रांगेने दर्शन घेत होतो. दर्शनासाठी देवळात तिकीट लावलेले पाहून जरां आश्चर्यच वाटले. पण रिवाज असेल म्हणून काढले तर पुन्हा देवळात माणशी १० रु मागितले. का? तर म्हणे देवीच्या दिव्याला तेल! गटाने ठरवून पैसे दिले नाहीत तर पुजाऱ्याशी खूप वादावादी झाली. पावती द्या तर देतो! असे म्हंटल्यावर आत सोडले पण केवळ महिला होतो म्हणून धटिंगण पुजाऱ्यांनी काही केले नाही आणि गटाने होतो म्हणूनच. केवळ एकीचे बळ मिळाले म्हणून कुप्रथेबद्दल निषेध नोंदवू शकलो. हे पूर्वनियोजित नसलेले गटाचे शिकणे झाले.

रात्री केंद्रात आल्यावर विवेकानंद केंद्र संस्थापक एकनाथजी रानडे यांच्या जीवनावरची फिल्म बघितली. शिलास्मारक उभारताना काय कष्ट घ्यावे लागले, एकेक खांब कसा चढवला हे बघताना तर सारे चित्रच डोळ्यासमोर उभे रहात होते. स्थानिक लोकांचा विरोध कसा मोडून काढला हेही लक्षात आले.

परतीचा प्रवास सुरू झाला. मग एक छोटीशी दर्शन सहल करायची ठरले होते. पहाटे ६ वाजता केंद्रातून निघालो जवळच असणारे दत्त मंदिर पाहिले. हे मंदिर नसरापूर भागातल्या नारायणपूरच्या महाराजांचे दत्तमंदिर आहे. ते पाहिले, हे दत्तमंदिर बाकी मंदीरासारखे व्यावसायिक वाटले नाही. मंदिरातील मराठी पुजाऱ्याचा परिचय करून घेतला, 'पुढच्या वेळी आपल्या माणसांनी इथेच मुक्कामी यायाचे बरं का' असे निमंत्रण घेऊन पुढे निघालो. त्रिवेंद्रम जवळचा समुद्राला लागून असणारा सागरी किल्ला पाहिला. मग खुद्द त्रिवेंद्रमला जाऊन शेषशाही भगवान यांचे पद्मनाभ मंदिर पाहिले. तीन दरवाजातून दर्शन घ्यावे लागण्या इतकी मोठी आणि रत्नजडीत निद्राधीन मूर्ती प्रथमच बघितली. मंदिरात जाताना बायकांना साडी हवी, नाही तर पंजाबी पोशाखावर बायकांना तर पँट घातलेल्या पुरुषांना पँटवर लुंगी नेसावी लागते असे पाहिले. तिथे लुंग्या विकतही होते. दर्शन झाल्यावर मंदिराचा अतिशय सुंदर कोरीवकाम असलेला मंडप फिरून पाहिला.

तिथून एर्नाकुलमला येताना या छोट्याशा दर्शन सहलीत केरळ बॅक वॉटर मध्ये स्वतंत्र बोटीने २ तास फिरलो. नदीचे गोडे पाणी समुद्राचे खाऱ्या पाण्याला मिळते हे चव घेऊन पाहिले. समुद्रातील खारफुट जंगल, तरंगणारे हॉटेल, चारी बाजूनी समुद्र असणारा छोटासा बीच बघितला. बोटीवरून शहाळे विकणारा विक्रेता बघितल्यावर तर मजाच वाटली. नदी मुख बघितले. नारळाच्या झाडीचे सौंदर्य डोळेभरून पाहिले!

रात्रीचा प्रवास करून बंगलोरला पोचलो. सोलापूरच्या प्रबोधिनीच्या शाळेत शिकलेली प्रज्ञाताई स्टेशनवर गाड्या घेऊनच आली होती. गाड्यांमध्ये सामान ठेऊन बंगलोर बघायला निघालो. बंगलोर मध्ये जिथे विवेकानंदांनी ध्यान केले त्या जागी असणाऱ्या रामकृष्ण आश्रमात गेलो. दर्शन घेतले. तिथे ध्यानाला बसण्यासाठी बसकरांची व्यवस्था होती. खूप शांतता होती. बरं वाटलं. मग नंदी मंदिर, गणपती मंदिर पाहिले, मुख्य गाव पाहिले. उपहार गृहात स्थानिक पदार्थांचा आस्वाद घेतला. कबन पार्कमध्ये तास भर होतो तिथे बंगलोरचा इतिहास प्रज्ञाताई कडून ऐकला. मग विधान भवनाची सुंदर इमारत बाहेरूनच पाहिली, महात्मा गांधी रस्ता अत्याधुनिक सुविधांनी कसा गजबजलाय हे पहात मुक्कामी पोचलो. हे शिरीष अंजळ यांच घर! शिरीषही प्रबोधीनिचेच विद्यार्थी, मिलाप सोशल वेन्चर्स या कंपनीचे तांत्रिक प्रमुख म्हणून कार्य करतात. संस्थेच्या वतीने गरजू माणसाला कर्ज दिले जाते. आरोग्यासाठी जगभरातील दात्यांकडून आर्थिक मदत उभी केली जाते. त्यासाठी काय करावे लागते हे त्यांनी सांगितले. तंत्रज्ञानाच्या मदतीने अनोळखी दात्या पर्यंत कसं पोचता येतं याचीही माहिती त्यांनी सांगितली. ते सार ऐकताना त्यांनी कामाची फि ल्म



दाखवली. फिल्म  बघताना ऐकावे ते नवलच असं सगळ्याचे होत होते. रात्रीचे १०.३० वाजले तरी प्रश्न संपत नव्हते. शेवटी एकीकडे जेवत गप्पा चालू झाल्या. सगळं अंजल कुटुंब आलं होतं प्रज्ञा–शिरीष यांची मुलगी मुक्ता, तिचे आजी आजोबा सगळे सोबत होते. एखाद्या कुटुंबात सुनेचे नातीचे कसे कौतुक होते हे सगळ्यांना जवळून बघायला मिळाले. सारेच अभिनंदनीय वाटले.

झोपून उठलो तर पुण्याला निघायचा दिवस उजाडला. भराभर आवारत साऱ्या गाडीत बसल्या. वाटेत नाश्ता करून विमानतळ गाठले एरवी १४ तास लागणारा प्रवास १.४० तासात होणार होता. ६ जणी विमानात प्रथमच बसत होत्या. उत्सुकता होती. आधी विमानात बसलेल्या अनुभवी कार्यकर्त्या मार्गदर्शन करायला सोबत होत्याच. त्यामुळे आपले सिट क्रमांक कसे वाचायचे तेही कळले, सिट बेल्ट लावणे शिकवणे लगेच झाले. सारे सुखरूप पार पडले आणि म्हणता म्हणता दुपारी २ वाजता आम्ही पुण्याला पोहोचलो सुद्धा!

एकूणच प्रवासातली निरीक्षणे खूप बारीक बारीक होती. स्टेशनवर गावाची नावे देवनागरी मध्ये लिहिली होती तरी वाचता येत नव्हते. दक्षिणेकडच्या मंदिरात बायकांनी पंजाबी घातले तर वरून लुंगी नेसावी लागते तर पुरुष पॅन्ट घालून येऊ शकत नाहीत. त्यांनाही लुंगी नेसावी लागते, हे नव्याने पाहिले. एरवी आपल्या इथे न दिसणारी मंदिराची भव्यता नि समृद्धी जवळून बघता आली. सामान्य माणूस सुद्धा कुणाला फसवणार नाही असा वाटला. एकुणात जास्त स्वच्छ, सुरक्षित पण वाटले, गुटखा बहाद्दर भेटले नाहीत. गाडीतून प्रवास करताना कोणीतरी सामान चोरेल असे कधीच वाटले नाही. फसवणारं कोणी दिसलं नाही. लोकांची मदत करण्याची वृत्ती होती. अनोळखी पुरुषांची पण ते रांगडे असले तरी भीती वाटली नाही. समाज समृद्ध असला की  असं होतं हे प्रथमच पाहिले. उन्हाने रापली असली तरी माणसं चांगली असतात हे समजलं. तिथे फक्त इडली डोसा मिळत होता त्याने आपले पोटच भरत नव्हते. नारळाच्या तेलात केलेला पदार्थ सुद्धा चांगले लागत होते. इथले लोक त्यांची वेगळीच भाषा बोलतात, त्यांना हिंदी इंग्रजी येतेच असे नाही.... तरी काही अडचण येत नाही. प्रबोधिनीतून बाहेर पडलेली माणसं रोज प्रबोधिनीत येत नसली तरी प्रबोधीनिचीच असतात हे प्रज्ञाताई व शिरीषदादांमुळे पुन्हा एकदा अनुभवलं! एक ना अनेक पण ‘ केल्याने देशाटन मनुजा येतसे चातुर्य फार’ हे ही खरेच हा अनुभव घेऊन सारा गट परतला.

प्रवासासाठी लागणारा सगळा खर्च प्रत्येकीने स्वतः केला होता. रु.१०,०००/– प्रत्येकीने जमा केले होते. सर्व प्रवास खर्च निवास खर्च, भोजन खर्च अगदी विमानाचा प्रवास सुद्धा धरून ७ दिवसाचा एकूण खर्च केवळ ७,८००/– आला. प्रत्येकीला रु.२,२००/– परत आले. ७ दिवस ६ रात्रीचा अभ्यास दौरा झाला. एकत्र गेल्याने गटाचा एकसंधपणा वाढला, गटातला मोकळेपणाही वाढला  आणि कामाला नवीन बळ मिळाले हेही मुद्दामून सांगावेसे वाटते!

**ज्ञान प्रबोधिनीला दिलेल्या देणग्या आयकर कायद्याच्या परि. ८० (जी) खाली करमुक्त आहेत.**

**‘ज्ञान प्रबोधिनी’  या नावाने धनादेश काढावा**

**ज्ञान प्रबोधिनी : स्त्री शक्ती प्रबोधन (ग्रामीण),**

संपर्क : ५१० सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३० दूरभाष : ०२० २४२०७१६२/१३३

★ **शिवापूर** : खेड–शिवापूर वाडा, ता. हवेली, जिल्हा पुणे, ४१२२०५

★ **आंबवणे** : मातृछाया, ता. वेल्हे, जिल्हा पुणे ★ **वेल्हे** : पोलिस स्टेशन जवळ, ता. वेल्हे, जिल्हा पुणे